नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर - 440018

महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर (मराठी) आणि NAGPUR POST (English)
घरपोच पाठविण्याची सुविधा.
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
4 रुपयात

* वर्ष ५१ * अंक २७५ * * अकोला * | मंगळवार, दिनांक १ एप्रिल २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

## जगातील सर्वात उंच रेल्वे पुलाचे उद्घाटन १९ ला

■ **वृत्तसंस्था, श्रीनगर, दि. ३१ :**
पंतप्रधान नरेंद्र मोदी १९ एप्रिल रोजी जम्मू आणि काश्मीरला भेट देणार आहेत. सर्वप्रथम, ते उधमपूरमध्ये जगातील सर्वात उंच रेल्वे पुलाचे (चिनाब पूल) उद्घाटन करतील. यानंतर, ते कटरा (माता वैष्णोदेवी) येथे पोहोचतील आणि जम्मू-श्रीनगर वंदे भारत एक्सप्रेस ट्रेनला हिरवा झेंडा दाखवतील.

केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह म्हणाले की, सध्या जम्मू रेल्वे स्थानकावर दुरुस्तीचे काम सुरू आहे, त्यामुळे कटरा येथून तात्पुरती रेल्वे सेवा सुरू करण्यात येत आहे. दुरुस्तीचे काम पूर्ण झाल्यानंतर, ही ट्रेन ऑगस्टपासून जम्मूहून धावण्यास सुरुवात करेल.

अग्राग्रलेख

### खरीखरी..

## राजसाहेबांची तळमळ

राज ठाकरे यांनी काल महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा गुढीपाडवा मेळावा प्रचंड गर्दीत साजरा केला. त्यावेळी त्यांनी इतर राजकारण्यांपेक्षा एकदम हटके विचार मांडले. राज ठाकरे जे बोलतील ते परखड असेल आणि जे त्यांना वाटेल ते देशहिताचे असेल. त्यात कोणाचाही मुलाहिजा न ठेवता ते पाहिजे ते बोलतात. मात्र अनेकांना असे वाटते की, राज साहेब कधी यांना पाठिंबा, कधी त्यांना पाठिंबा, तर कधी स्वतंत्र लढतात. पण त्यांना यश का मिळत नाही. मात्र आम्हाला असे वाटते की, आपल्या देशात जो नेता थापा मारून जनतेला आपल्याकडे वळवू शकतो. तोच नेता मोठा नेता होऊ शकतो. राज ठाकरे थापा मारण्यापेक्षा परखड बोलतात. हा यातला फरक आहे. आताचीच गोष्ट घ्या ना. सत्तेत असलेल्या महायुतीने सत्ता मिळवण्यासाठी जी जी वचने दिली होती. ती वचने प्रत्येकाच्या खात्यात 15 लाख रुपये येतील, या वचनासारखीच फोल ठरली. महाराष्ट्रा सारख्या श्रीमंत राज्याला फुकटेगिरीची असली सगळी वचने देताना आठ लाख कोटींच्या वर कर्ज होते. आताही लाडक्या बहिणींना इमानदारीने पैसे दिले. तर दरवर्षी 50 हजार कोटी रुपयांचे कर्ज वाढेल. शेतकऱ्यांची कर्जमाफी केली. तर त्यात आणखी भर पडेल. राज साहेबांनी निवडणुकीपूर्वीच ही लाडक्या बहिणींची योजना चालणार नाही, असे स्पष्टपणे सांगितले होते. पण आपल्या समाजाला फुकटेगिरीची चटकच लागलेली आहे. ती इतकी लागलेली आहे की, हे फुकटचे घेणे म्हणजे एक प्रकारचे विष आहे. हे कोणालाच कसे कळत नाही. याचे आम्हाला आश्चर्य वाटते. दुसरा अत्यंत महत्त्वाचा मुद्दा त्यांनी मांडला. तो म्हणजे नद्यांच्या अस्वच्छतेचा आणि त्या स्वच्छ करण्याचा आहे. राज्यासह देशांमधील कित्येक नद्यांमध्ये अत्यंत घाणेरडे पाणी आहे. राज साहेबांनी नावानिशी जवळपास 55 नद्या कशा घाणेरड्या आहेत आणि त्या नद्यांमधील पाण्याने आपण साधी चूळही भरू शकत नाही, हे स्पष्ट केले. अगदी पवित्र गंगाजलही साधे गुळण्या करण्याच्याही लायकीचे नाही. हेही ते जाहीरपणे स्पष्ट बोलले. पण आपला समाज कोट्यावधींच्या संख्येने गंगेत डुबकी मारायला गेलाच. अगदी वाटेल ते कष्ट सोसून त्यांनी त्या पाण्यात डुबकी मारण्याचे अति पुण्यकर्म केलेच. मुंबई शहरात काही वर्षांपूर्वी पाच नद्या होत्या. त्यापैकी चार कायमच्या ठार झाल्या. म्हणजेच मरण पावल्या. उरलेली मिठी नदी इतकी खारी म्हणजेच खारट झालेली आहे. तेथील सर्व गोष्टीचे दर्शन घेतल्यावर तुम्हाला त्या ठिकाणी ओकारीही करावीशी वाटणार नाही. म्हणजेच देशातील नद्यांसह देशातील आणि राज्यातील राजकारण किती प्रदूषित झालेले आहे. याचा स्पष्टपणे उच्चार करण्याची हिम्मत एकमेव राज साहेब ठाकरे यांनी दाखवली. सध्या महाराष्ट्रात औरंगजेबाची कबर हे चलनी नाणे आहे. त्याबद्दलही राज ठाकरे यांनी जी भूमिका मांडली. ती निश्चितच इतिहासकालीन पराक्रमाची जाणीव असलेल्या मराठी मनांना सुखावणारी आहे. राज ठाकरे म्हणतात की, सिनेमा पाहून माथी भडकवून घेणे मूर्खपणाचे आहे. हे वाक्य स्पष्ट करताना व्हाट्सअप बघून इतिहास समजणार नाही. तर त्यासाठी पुस्तके वाचावी लागतील. या वाक्यामुळे सोशल मीडियाच्या आहारी गेलेल्या सर्वांच्या डोळ्यात त्यांनी झणझणीत अंजन घातलेले आहे. अशा प्रकारच्या अनेक मुद्द्यांवर स्पष्टपणे विचार व्यक्त करून जनतेला विचार करण्यासाठी प्रवृत्त करणारे राज ठाकरे हे एक वेगळे नेते आहेत. त्यांना निवडणुकीच्या प्रांगणात अपयश का येते. याचे संशोधन होणे गरजेचे आहे. खरेतर लोकांना जे पचते ते बोलावे. असा त्यांचा स्वभावही नाही आणि खाक्याही नाही. जनतेच्या हितासाठी जे जे आवश्यक आहे. तेच आपण बिनधास्तपणे बोलू. हा त्यांचा प्रबोधनकारी बाणा आहे. राज ठाकरे यांचे आजोबा प्रबोधनकार यांनी त्या काळातही अनेक अनिष्ट रुढींच्या विरोधात हल्लाबोल केला होता. अगदी परखडपणे मते मांडली होती. तीच परंपरा आता राज ठाकरे पुढे चालवू पाहत आहेत. समाजातील त्यावेळच्या विकृती आजही तशाच कायम आहेत. हे त्यांनी आपल्या आजोबांच्या पुस्तकातील उतारा वाचून संदर्भासह स्पष्टपणे सांगितले. त्यांनी जनतेच्या कोर्टात आपली खरीखरी फिर्याद दाखल केलेली आहे. जनतेला आपले कल्याण करायचे असेल. तर त्यांना साथ द्यावी, प्रतिसाद द्यावा. नाहीतर समोरच्यांनी सांगितलेल्या खोट्या थापांच्या घाणेरड्या खड्ड्यात उडी मारावी. आता जनतेला ठरवायचे आहे की, आपण भूलथापांना बळी पडायचे की, सच्चेपणाला साथ द्यायची. गुलूगुलू बोलून प्रेयसीला पटवल्यानंतर गोड-गोड बोलणारा आपला प्रियकर भलताच फडतूस आहे. असे प्रेयसीला जेव्हा पटते. तेव्हा बराच वेळ निघून गेलेला असतो. सध्याच्या राजकारणात खोटे बोलून थापा मारून नको ती आश्वासने, देऊन खड्ड्यात लोटणारे अनेक पुढारी आहेत. त्यांच्या पेंढारीपणाचा बुरखा राज ठाकरे यांनी अक्षरशः टराटरा फाडला आहे. हेच कालच्या सभेचे वैशिष्ट्य आहे. तुम्ही राज ठाकरे यांना माना किंवा मानू नका. त्यांच्या मनातील सच्चेपणाला दाद देणे. हाच खरा समाजातील सुव्यवस्था राखण्याचा आधार आहे, असे आम्हाला वाटते. जनतेने एवढे तरी ध्यानी घ्यावे. एवढीच आमच्या आग्रहाची सूचना किंवा विनंती आहे. बाकी, आव-जाव घर तुम्हारा!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# बीड कारागृहात राडा!

वाल्मीक कराडसह सुदर्शन घुलेला चोपले; महादेव गित्ते, अक्षय आठवले यांच्याकडून हल्ला



■ **वृत्तसंस्था, बीड, दि. ३१ :**
मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात अटकेत असणाऱ्या वाल्मीक कराड व सुदर्शन घुलेला बीड जिल्हा कारागृहात मारहाण झाल्याची धक्कादायक बाब उजेडात आली आहे. महादेव गित्ते व अक्षय आठवले यांनी ही मारहाण केल्याची माहिती आहे. भाजप आमदार सुरेश धस यांनी तसे संकेत दिलेत.

वाल्मीक कराड व सुदर्शन घुले यांच्यासह सरपंच संतोष देशमुख हत्याकांडातील इतर आरोपी सध्या बीड कारागृहात बंदिस्त आहेत. सोमवारी सकाळी कैद्यांना नाष्टा दिला जात होता. त्यावेळी वाल्मीक कराड व सुदर्शन घुलेवर हल्ला झाला. याच कारागृहात शिक्षा भोगणाऱ्या महादेव गित्ते व अक्षय आठवले यांनी हा हल्ला केल्याची माहिती आहे. या सर्वांवर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, महादेव गित्ते आणि वाल्मीक कराड व सुदर्शन घुले यांच्यात गत ४-५ दिवसांपासून वाद सुरू होता. त्यांच्यात सातत्याने शाब्दिक चकमक सुरू होती. यामुळे तुरुंग प्रशासनाने कारागृहात पोलिसांची जादा कुमकही मागवली होती. पण आज सकाळी उभयंतांत पुन्हा बाचाबाची झाली आणि त्याचे पर्यावसान हाणामारीत झाले.

अक्षय आठवले व महादेव गित्ते हे दोघेही वाल्मीक कराड व सुदर्शन घुलेवर धावून गेले. यावेळी वाल्मीक कराडला मारण्यात आल्याची माहिती आहे. गित्ते व आठवले हे तुरुंगात एकाच बराकीत आहेत. तर वाल्मीक कराड दुसऱ्या बराकीत आहेत.

दुसरीकडे, राज्याचे विशेष कारागृह महानिरीक्षक जालिंदर सुपेकर यांनी वाल्मीक कराड व सुदर्शन घुलेला कारागृहातमारहाण झाल्याचे वृत्त फेटाळले आहे.

### ४ जणांना 'हर्सुल'ला हलवले

बीड जिल्हा कारागृहात आज वाल्मीक कराड आणि सुदर्शन घुले यांना मारहाण केल्याच्या आरोप ठेवत महादेव गित्ते आणि त्याच्या चार साथीदारांना बीड कारागृहातून छत्रपती संभाजीनगर येथील हर्सूल कारागृहात हलवण्यात आले आहे. मात्र, कराड आणि घुलेला नाही, तर आम्हाला मारहाण झाल्याचा दावा महादेव गित्ते याने केला आहे. कारागृहातील या घटनेनंतर दक्षता म्हणून महादेव गित्तेसह त्याच्या साथीदारांना हर्सूल कारागृहात हलवण्याचा तुरुंग प्रशासनाने निर्णय घेतला.

## रस्त्यावरील गँगवॉर जेलमध्ये



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३१ :**
महायुतीच्या सरकारच्या काळात राज्यातील कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न अत्यंत गंभीर झाला आहे. बीड जिल्ह्यामध्ये तर कायद्याचे नाही गुंडाराज आले आहे, बीडच्या रस्त्यावर सुरु असलेले गँगवॉर आता जेलमध्ये पोहोचले आहे. पोलिस आणि गृहविभाग काय करत आहे? असा संतप्त सवाल काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला. देवेंद्र फडणवीस यांनी गृहखात्याचा मोह सोडून राज्याला पूर्णवेळ गृहमंत्री द्यावा, अशी मागणीही त्यांनी केली.

हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, महाराष्ट्रातील कायदा सुव्यवस्थेची स्थिती अत्यंत गंभीर झाली आहे. पण सरकारला याचे काही गांभीर्य आहे असे दिसत नाही. राज्यात गुन्हेगारी मोठ्या प्रमाणात वाढली, सरकारी आशिवार्दाने वाळू, जमीन, पवनचक्की, मटका, दारू, कोळसा माफिया तयार झाले आहेत. ते दररोज पोलिसांना आव्हान देत आहेत. खून, दरोडे, महिला अत्याचाराच्या घटना दररोज घडत आहेत, अशी टीका हर्षवर्धन सपकाळ यांनी केली.

गेल्या काही दिवसांत सरकारच्या आणि विशेषतः गृह विभागाच्या गलथानपणामुळे महाराष्ट्राच्या नावाला काळिमा लागला असून महाराष्ट्राची तुलना जंगलराजसोबत होऊ लागली आहे. सत्ताधारी पक्षाचे आमदारच बीडचा बिहार, तालिबान झाला आहे असे सपकाळ म्हणाले.

## मुलांच्या शिक्षणाबाबत सरकार उदासीन



■ **वृत्तसंस्था,नवी दिल्ली, दि.३१ :**
काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांनी राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० वर टीका केली आहे.

एका लेखात सोनिया गांधी यांनी लिहिले आहे की, 'केंद्र सरकार शिक्षण धोरणाद्वारे आपला ३सी अजेंडा (केंद्रीकरण, व्यापारीकरण आणि सांप्रदायिकता) राबवत आहे.

मोदी सरकार शिक्षण व्यवस्था कमकुवत करत आहे, राज्य सरकारांना महत्त्वाच्या धोरणात्मक निर्णयांपासून दूर ठेवून मोदी सरकार शिक्षणाची संघीय रचना कमकुवत करत आहे असे सोनिया गांधी यांनी लिहिले आहे.

# म्हाडा बांधणार १९ हजार घरे




■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३१ :**
महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा) ने आगामी आर्थिक वर्ष 2025-26 मध्ये राज्यभरात 19 हजार 497 घरे बांधण्याची योजना जाहीर केली आहे. मुंबई, पुणे, कोकण, नाशिक, अमरावती, छत्रपती संभाजीनगर आणि नागपूर येथील प्रादेशिक मंडळांमार्फत ही योजना अंमलात आणली जाईल, असे गृहनिर्माण संस्थेने म्हटले आहे.

म्हाडाच्या मंजूर वार्षिक अंदाजपत्रकांतर्गत यासाठी 9 हजार 202.76 कोटी रुपयांची अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे.

म्हाडाचा सन 2024-25 चा सुधारित व सन 2025-2026 चा अर्थसंकल्प प्राधिकरणास नुकताच सादर करण्यात आला. प्राधिकरणाच्या सन 2025-2026 च्या 15 हजार 951.23 कोटी रुपयांच्या अर्थसंकल्पाला व सन 2024-25 च्या 10 हजार 901.07 कोटी रुपयांच्या सुधारित अर्थसंकल्पाला महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाची नुकतीच मंजुरी मिळाली.

मुंबई मंडळाअंतर्गत 5199, कोकण मंडळाअंतर्गत 9902, पुणे मंडळाअंतर्गत 1836, नागपूर मंडळाअंतर्गत 692, छत्रपती संभाजीनगर मंडळाअंतर्गत 1608, नाशिक मंडळाअंतर्गत 91 तर अमरावती मंडळाअंतर्गत 169 घरे बांधली जाणार असून, त्यासाठी 65.96 कोटी रुपयांची तरतूद आहे.

# वैदिक गणित गुणवत्ता केंद्र सुरू व्हावे




मुख्यमंत्री फडणवीस यांची अपेक्षा : वैदिक गणिताच्या खंडांचे प्रकाशन

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३१ :**
भारतात विकसित झालेल्या विविध शास्त्रांचा पाया गणितावर आधारित आहे. वैदिक गणिताच्या खंडाद्वारे हे ज्ञान नव्याने समाजासमोर येणार आहे. वैदिक गणिताची महती व उपयोग येणाऱ्या पिढ्यांपर्यंत पोहचणे गरजेचे आहे. त्याकरिता भारती कृष्ण विद्या विहार येथे वैदिक गणिताचे गुणवत्ता केंद्र उभारले जावे, अशी अपेक्षा व्यक्त करत यास शासनातर्फे संपूर्ण सहकार्य करण्यात येईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

विश्व पुनर्निर्माण संघ संचालित भारती कृष्ण विद्या विहार शाळेमध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांच्या हस्ते आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत आद्य शंकराचार्य कृष्ण तीर्थ महाराज लिखित वैदिक गणिताच्या दोन खंडांचे प्रकाशन झाले. विश्व पुनर्निर्माण संघाचे अध्यक्ष प्रफुल्लकुमार काळे, सरचिटणीस शैलेश जोगळेकर, संचालक मंडळाचे सदस्य यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, प्राचीन भारतीय संस्कृतीत अनेक महत्वाची शास्त्र विकसित झाली. मात्र, परकीय आक्रमण आदींमुळे या शास्त्रांतील ज्ञान सर्वांपर्यंत पोहचू शकले नाही. आद्य शंकराचार्य कृष्ण तीर्थ महाराज यांनी वेद ऋचांचा अभ्यास करून सोप्या पद्धतीने संपूर्ण गणिताची मांडणी वैदिक गणित खंडांमध्ये केली आहे.

केंद्रीय माध्यमिक मंडळाच्या इयत्ता पाचवी ते सातवी च्या अभ्यासक्रमात या पुस्तकाचा समावेश करण्यात आला आहे. या खंडांच्या माध्यमातून वेदांमधील ज्ञानाचा साठा शंकराचार्यांनी शोधला आहे. वैदिक गणित ही भारताची महत्वाची, मोठी ज्ञानसंपदा आहे. त्यासंदर्भात संशोधन व संवर्धन होण्याच्या दृष्टीने भारती कृष्ण विद्या विहारामध्ये गुणवत्ता केंद्र उभारले जावे, अशी अपेक्षा फडणवीस यांनी व्यक्त केली.

सरसंघचालक डॉ. मोहन भागवत म्हणाले, मानवी जीवनात अनेक प्रसंगांमध्ये गणना, आकडेवारीचे अनन्यसाधारण महत्व आहे. प्राचीन भारतीय परंपरेतून आलेल्या वैदिक गणिताचा विचार हा विश्व कल्याणासाठी आहे.

जगात अध्यात्मावर आधारित घडत असलेल्या विविध परिवर्तन आणि पुनर्रचनेमध्ये वैदिक गणितही महत्वाची भूमिका निभावू शकते आणि जगाला सुखी व समृद्ध बनविण्यातही मोलाचे योगदान देवू शकते असे त्यांनी सांगितले. विश्व पुनर्निर्माण संघाचे अध्यक्ष प्रफुल्लकुमार काळे यांनी प्रास्ताविक केले तर सरचिटणीस शैलेश जोगळेकर यांनी आभार मानले.

## गणिताची भीती..



सरसंघचालक मोहन भागवत आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या शालेय जीवनातील गणिताच्या भीतीचे किस्से सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की दहावीपर्यंत ते गणितात पास झाले. मात्र अकरावीत विज्ञान शाखेत प्रवेश घेताना त्यांनी गणिताऐवजी अर्थशास्त्र विषय निवडला. सरसंघचालक भागवत यांनीही गणिताच्या भीतीमुळे दहावीत गणित सोडल्याचे सांगितले. त्यांनी पुढे स्पष्ट केले की गणित हे सृष्टीच्या उत्पत्तीशी निगडित आहे. ते केवळ आकड्यांचे शास्त्र नसून त्याचा विचार विश्वकल्याणाच्या दृष्टीने झाला आहे.

## कोलकाता ११६ धावांवर गारद

अश्विनी कुमारने घेतल्या ४ विकेट



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३१ :**
आयपीएल २०२५ चा १२ वा सामना मुंबई इंडियन्स आणि कोलकाता नाईट रायडर्स यांच्यात मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर खेळला जात आहे. मुंबईने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. कोलकाताने सर्व गडी गमावून ११६ धावा केल्या. इम्पॅक्ट खेळाडू मनीष पांडेला (१९ धावा) पदार्पणाचा सामना खेळणाऱ्या अश्विनी कुमारने त्रिफळाचित केले. त्याने रिंकू सिंग (१७ धावा) आणि कर्णधार अजिंक्य रहाणे (११ धावा) यांनाही पॅव्हेलियनमध्ये पाठवले. कोलकाताचा हा निच्चांकी स्कोर असल्याचे समजते.









# महाराष्ट्रात गुजरात मॉडेल राबवण्याचा आरएसएसचा डाव

## ॲड. आंबेडकर यांचा आरोप




■ **मुंबई :** राज्यात नरेंद्र मोदी धार्मिक, जातीय तेढ निर्माण करायला आले आहेत, असे वाटते. नरेंद्र मोदी यांच्या महाराष्ट्र दौऱ्याच्या खुशीत हिंदुत्ववाद्यांनी धार्मिक तेढ वाढवण्यासाठी बीडमध्ये रमजान ईदच्या पार्श्वभूमीवर एका मशिदीत जिलेटिनचा स्फोट घडवला. सुदैवाने यात जीवितहानी झाली नाही, यात दोन आरोपींना पकडले गेले. दुसऱ्या बाजूला, मालेगाव बॉम्बस्फोटातील आरोपी साध्वी प्रज्ञासिंहचा मालेगावातच आज जाहीर सत्कार करून 'हिंदूवीर' पुरस्काराने सन्मान करण्यात येणार आहे. याच कार्यक्रमात कोरेगाव भीमा हल्ल्यातील आरोपी मिलिंद एकबोटे देखील असणार आहे. हा सगळा घटनाक्रम पाहता गुजरात मॉडेल महाराष्ट्रात राबवण्याचा आरएसएसचा डाव आहे, अशी टीका वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी केली आहे. या संदर्भातील भूमिका त्यांनी ट्विटद्वारे मांडली आहे.

धार्मिक तेढ निर्माण करणारे गुजरात मॉडेल आरएसएसला महाराष्ट्रात राबवायचे आहे. त्यासाठी त्यांच्या कार्यकर्त्यांना अशा कार्यक्रमांमधून प्रशिक्षित करण्याचा आरएसएसचा उद्देश आहे. बीड आणि मालेगाव या दोन्ही घटना धार्मिक, जातीय तेढ वाढवून आपला राजकीय डाव साधणाऱ्या आहेत. यावर काँग्रेस नेहमीप्रमाणे गप्प आहे! फक्त आणि फक्त वंचित बहुजन आघाडी या विरोधात लढत आहे. महाराष्ट्राला धार्मिक तेढ आणि जातीयवादाचे केंद्र होऊ देणार नाही. या विरोधात आम्ही लढत राहू! आपले कोण? परके कोण? हे ओळखा!, असे आवाहनही त्यांनी ट्विट द्वारे केले आहे.

# औरंगजेबाच्या कबरीवरून शिंदे गटात मतभेद

## कबर नको, शिरसाटांची भूमिका; शंभूराज देसाई म्हणतात.. कबर राहु द्या!







■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ३१ :**

महाराष्ट्रात गेल्या महिनाभरापासून सुरू असलेला औरंगजेबाच्या कबरीचा वाद शमल्याचे दिसत नाही. यावरून राजकीय वतुर्ळात अनेक दावे-प्रतिदावे केले जात आहेत. अशात आता औरंगजेबाच्या कबरीवरून शिंदे गटामध्येच मतभेद असल्याचे दिसून येत आहे.

औरंगजेबाची कबर तिथे नको, अशी भूमिका संजय शिरसाट यांनी घेतली आहे. मात्र, शंभूराज देसाई यांचे वेगळेच म्हणणे आहे. कबर तिथेच राहु द्या, पण तिचे उदात्तीकरण व्हायला नको, असे शंभूराज देसाई यांनी म्हटले आहे.

ज्या वाईट खुना असतात, त्या दूर केल्या पाहिजेत. त्यामुळे भैय्युजी महाराजांनी जरी स्टेटमेंट केले असेल, अनावश्यक वाटत असेल, परंतु हा आमच्या छत्रपती संभाजीनगर आणि महाराष्ट्राच्या स्वाभीमानाचा विषय आहे. आम्हाला त्या वाईट आठवणीला उजाळा द्यायची आवश्यकता वाटत नाही. म्हणून आम्ही घेतलेली ही भूमिका आहे. संघाच्या भूमिका काही असू शकते. त्यांच्या भूमिकेला आम्ही विरोध करत नाही. संघाची भूमिका काही असली, तरी आमची भूमिका कबर नको अशी ठाम आहे, असे संजय शिरसाट म्हणाले.

**काय म्हणाले शंभूराज देसाई?**

औरंगजेबाची कबर जिथे आहे, तिथेच राहु द्या. परंतु, त्याचे उदात्तीकरण व्हायला नको. त्याला धार्मिक स्थळाचा दर्जा देऊ नये. त्या ठिकाणी कोणते मोठे बांधकाम होता कामा नये. राज ठाकरे म्हणतात, त्याप्रमाणे तिथे लिहिले पाहिजे, जो महाराष्ट्र स्वराज्य संपवायला आला होता, तो स्वतः या मातीत गाडला गेला. पण तो स्वराज्याला हात लावू शकला नाही. असा मोठा बोर्ड लावण्यात यावा.

औरंगजेबाचा अंत कसा झाला, हे पुढील पिढ्यांना समजले पाहिजे. यासाठी राज ठाकरे जे म्हणाले ते योग्य आहे, असे शंभूराज देसाई म्हणाले.

**जोशी यांची प्रतिक्रिया**

औरंगजेबाच्या कबरीचा विषय अनावश्यकपणे चर्चिला जात आहे. औरंगजेबाचा मृत्यू इथे झाला तर त्याची कबर इथेच असणार. काही लोकांची श्रद्धा असेल तर ते तिथे जातील. छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श आहे. त्यांनी तर अफजलखानाचीही कबर किल्ल्यावर बनवली आहे.

हे भारताच्या उदारतेचं, सर्वसमावेशकतेचे प्रतीक आहे, असे भैय्याजी जोशी म्हणाले.

**राज ठाकरेंची भूमिका**

दरम्यान, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनीदेखील औरंगजेबाच्या कबरीबाबत संघाच्या भूमिकेप्रमाणेच भूमिका मांडली.

औरंगजेबाच्या कबरीवरची सजावट काढून टाका. तिथे फक्त कबर दिसली पाहिजे आणि तिथे एक बोर्ड लावा. आम्हा मराठ्यांना संपवायला आलेला औरंगजेब इथे गाडला गेला असे त्यावर लिहा. हा आमचा इतिहास आहे, असे राज ठाकरे म्हणाले.

औरंगजेबाला शिवाजी नावाचा विचार मारायचा होता. पण हे औरंगजेबाला जमले नाही, शेवटी तो इथेच मेला, असेही राज ठाकरे म्हणाले.

# नद्यांच्या प्रदुषणावर राज ठाकरेंचा मुद्दा योग्यच

## भुजबळांनी केली पाठराखण



■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ३१ :**

नद्यांच्या प्रदुषणावर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी व्यक्त केल्या भूमिकेचे सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी समर्थन केले आहे. राज ठाकरे नदी प्रदुषणाच्या मुद्यावर जे काही बोलले, ते योग्यच आहे. बाकी काही करा किंवा करू नका. पण गोदावरीचे पाणी स्वच्छ करा असा माझा आग्रह आहे. स्टार्म वॉटर ड्रेनेजमध्येच संडासचे पाईप जोडण्यात आलेत. त्यामुळे सकाळ - संध्याकाळ बदाबदा ती सर्व घाण गोदावरीत पडते, असे ते म्हणालेत.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी रविवारी गुढीपाडव्याच्या मेळाव्यातील भाषणात पुन्हा एकदा नद्यांच्या प्रदुषणाचा मुद्दा उपस्थित केला होता. गंगा नदीत अर्धवट जाळलेली प्रेते टाकली जातात. त्यामुळे गंगेचे पाणी हे पिण्यासाठीच नव्हे तर आंघोळीसाठीही योग्य नाही, असे ते म्हणाले होते. तत्पूर्वी, त्यांनी कुंभमेळ्यातून आणलेले पाणी पिणार नसल्याचेही ठणकावून सांगितले होते.

छगन भुजबळ यांनी त्यांच्या या विधानाचे जोरदार समर्थन केले आहे. यासंबंधी ते पत्रकारांशी बोलताना म्हणाले, राज ठाकरे जे म्हणाले ते योग्यच आहे. त्यांच्या नदी प्रदुषणासंदर्भातील मताशी मी सुद्धा सहमत असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांनी म्हटले आहे.

# आव्हाडांनी मानले राज ठाकरेंचे आभार



**मुंबई :** गुढी पाडव्याच्या दिवशी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा दादरच्या शिवाजी पार्क मैदानात दरवर्षी प्रमाणे भव्य मेळावा पार पडला. या मेळाव्यात राज ठाकरे यांचे भाषण ऐकण्यासाठी मोठ्या संख्येने मनसैनिक तसेच जनता उपस्थित होती. यावेळी बोलताना राज ठाकरे यांनी अनेक मुद्यांवर भाष्य केले. तसेच औरंगजेबच्या कबरीवर देखील भाष्य करत ती कबर का हटवू नये, यामागचे कारण राज ठाकरे यांनी स्पष्ट केले आहे. राज ठाकरेंच्या या विचारावर राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी आभार मानले आहेत.

जितेंद्र आव्हाड यांनी एक्स या समाज माध्यमावर पोस्ट शेअर करत मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचे आभार मानले आहेत. जितेंद्र आव्हाड म्हणाले, मी जे औरंगजेब/अफजलखानाबद्दल बोललो, तेच राज ठाकरे बोलले. आभार. महाराजांचा इतिहास पुसू देणार नाही. राज ठाकरे यांनी औरंगजेबाच्या कबरीवर अतिशय योग्य भूमिका मांडली तीच भूमिका मी विधानसभेत मांडली होती, असे जितेंद्र आव्हाड म्हणाले. असे म्हणत जजीतेनदर आव्हाड यांनी राज ठाकरे तसेच त्यांचा विधानसभेतील व्हिडिओ पोस्ट केला आहे.

औरंगजेब हा आमचा इतिहास आहे. इतिहास कशासाठी वाचायचा. इतिहासातून बोध घेण्यासाठी वाचायचा. मराठ्यांनी ज्यांना गाडले त्याची प्रतीके नष्ट करून चालणार नाही. जगाला कळले पाहिजे आपण त्यांना गाडले, असे राज ठाकरे यांनी त्यांच्या भाषणात म्हटले. पुढे बोलताना राज ठाकरे म्हणाले, 1689 ते 1707 म्हणजे 27 वर्ष औरंगजेब महाराष्ट्रात लढत होता. संभाजी राजांबरोबर लढला. त्यांना क्रूर पद्धतीने मारले. राजाराम महाराज, संताजी धनाजी, ताराराणी साहेब लढल्या. औरंगजेब एकही लढाई जिंकू शकला नव्हता. त्याला शिवाजी नावाचा विचार मारायचा होता. पण कमळे नाही. सर्व प्रयत्न केले आणि तो मेला, असे राज ठाकरे म्हणाले होते.



■ **जालना :** आ. अर्जुनराव खोतकर यांची अंदाज समिती (मंत्री पदाचा दर्जा) च्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करताना सीए गोविंदप्रसाद मुंदडा, शिवसेना शहरप्रमुख विष्णू पाचफुले, मेघराज चौधरी.

# दगडूशेठ गणपती मंदिराचा संगीत महोत्सव



■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. ३१ :**

ड्रम, डफ, घुंगरू, शंख यांसह विविध वाद्यांवर नाद उमटवित रसिकांना मंत्रमुग्ध करणारे वादन सादर करताना प्रख्यात ड्रम वादक शिवमणी, रुना रिझवी शिवमणी, पंडित रविचारी व सहका-यांनी 'पुष्पांजली' स्वरमैफलीने श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टच्या संगीत महोत्सवाचा प्रारंभ झाला. पुणेकरांनी हे वाद्यवादन प्रत्यक्ष अनुभवताना नादब्रह्माची अनुभूती घेतली.

श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळतर्फे गणपती मंदिराच्या ४१ व्या वर्धापनदिनानिमित्त गुढीपाडव्यापासून बाजीराव रस्त्यावरील नू.म.वि.प्रशालेच्या प्रांगणात संगीत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. महोत्सवाचे उद्घाटन पोलीस आयुक्त अमितेश कुमार, पदमश्री शिवमणी यांच्या हस्ते झाले.

यावेळी परिमंडळ १ चे पोलीस उपायुक्त संदीपासिंग गिल, ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, उपाध्यक्ष माणिक चव्हाण, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, सरचिटणीस व आमदार हेमंत रासने, सहचिटणीस अमोल केदारी, उत्सव प्रमुख अक्षय गोडसे, सुवर्णयुग तरुण मंडळाचे अध्यक्ष प्रकाश चव्हाण यांसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

पुष्पांजली कार्यक्रमाचा प्रारंभ गणेश वंदनेने झाला. त्यापूर्वी बहारदार सनई वादनाने मैफलीचा प्रारंभ झाला. यावेळी प्रथम तुला वंदितो, तुज मागतो मी आता, बाप्पा मोरया रे., चिक मोत्याची माळ, मोरया मोरया मंगलमूर्ती मोरया.. या गीतांचे स्वर सनई या पारंपरिक वाद्यातून रसिकांना ऐकायला मिळाले.

प्रास्ताविकात ट्रस्टचे सरचिटणीस व आमदार हेमंत रासने म्हणाले, चौदा विद्या चौसष्ठ कलांचा अधिपती असलेल्या गणरायासमोर ही संगीत सेवा रसिकांसाठी अनेक वर्षांपासून उपलब्ध करून दिली जात आहे. यंदा ३ एप्रिल पर्यंत संगीत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशभरातील दिग्गज कलाकारांचा कलाविष्कार अनुभविण्याची संधी पुणेकरांना मिळणार आहे.

# भावाचा खून करणाऱ्या आरोपीची आत्महत्या

■ **वृत्तसंस्था, हिंगोली, दि. ३१ :**

शेंबाळपिंपरी (ता. पुसद) येथे दुचाकी नेण्याच्या किरकोळ कारणावरून सख्या भावाचा खून करणाऱ्या आरोपी भावाने कळमनुरी शिवारात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना सोमवारी ता. ३१ सकाळी उघडकीस आली आहे.

शेंबाळपिंपरी (ता.पुसद) येथील मनीष जयवंता शिरफुले (२३) याचा त्याचा भाऊ दिनेश जयवंता शिरफुले (२१) याच्या सोबत दुचाकी बाहेर नेण्याच्या कारणावरून वाद झाला होता. या वादात मनीष याने दिनेश याला मारहाण केली. या मारहाणी दिनेश खाली पडल्यानंतर त्याच्या डोक्याच्या पाठीमागे लोखंडी फावड्याने वार केला. यामध्ये त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. त्याला यवतमाळ येथे उपचारासाठी नेत असतांनाच त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी खंडाळा (ता. पुसद) पोलिस ठाण्यात शनिवारी खूनाचा गुन्हा दाखल झाला होता.

# निवडणुकीआधी मनसेची दिशाहीनता कायम

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३१ :**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे (मनसे) अध्यक्ष राज ठाकरे यांच्या गुढीपाडव्याच्या मेळाव्यात शिवतीर्थावर कार्यकर्त्यांना पुढील दिशा मिळेल, अशी अपेक्षा होती. मात्र, काल झालेल्या या सभेत राज ठाकरे यांनी पुन्हा एकदा स्पष्ट रणनीती देण्यात अपयश स्वीकारले.

आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षाच्या अस्तित्वाचा प्रश्न गंभीर बनला असताना, या भाषणातून कार्यकर्त्यांमध्ये संभ्रमच वाढला आहे. सत्ताधाऱ्यांवर टीका आणि त्यांच्यासोबत जाण्याची परस्परविरोधी भाषा यामुळे मनसेची दिशा काय, हेच अस्पष्ट राहिले.

शिवतीर्थावरील मेळाव्यात राज ठाकरे यांनी नेहमीप्रमाणे प्रभावी शैलीत भाषण केले. पण या भाषणातून कार्यकर्त्यांना ठोस मार्गदर्शन मिळाले नाही. विधानसभा निवडणुकीतील दारुण पराभवानंतर पक्षाला उभारी देण्यासाठी कार्यकर्ते उत्सुक होते. मात्र, पुढे काय करायचे? या प्रश्नाचे उत्तर राज यांच्याकडून मिळाले नाही.

# पालघरमध्ये आढळला आई, बाबा हाका मारणारा कावळा



■ **महासागर प्रतिनिधी**
**पालघर, दि. ३१ :**

आपण पोपटाला काही प्रमाणात माणसासारखे बोलताना पाहिले असेल. मात्र पालघर जिल्ह्यात एक कावळा आढळून आला आहे जो माणसाप्रमाणे बोलतो.

पालघर जिल्ह्यातील अतिदुर्गम भागात असलेले गारगाव या गावात हा कावळा आढळून आला आहे. या बोलणाऱ्या कावळ्याने सोशल मीडियावर सर्वांचेच लक्ष वेधले आहे.

पालघर जिल्ह्यातील गारगाव या गावातील एका आदिवासी कुटुंबाने या कावळ्याचे संगोपन करत त्याला घरी पाळले आहे. हा कावळा अगदी माणसासारखा बोलायला शिकला आहे. लहान असतानापासून हा कावळा याच कुटुंबात वाढला असल्याने तो चक्क माणसासारखे बोलायला शिकला आहे.

मंगळ्या मुखणे असे कुटुंबीयांचे नाव असून त्यांनीच या कावळ्याचे संगोपन केले आहे. तीन वर्षांपूर्वी मुलांनी कावळ्याचे पिल्लू आणले होते. हे कावळ्याचे पिल्लू मंगळ्या मुखणे यांच्याच घरात लहानाचा मोठा झाला आहे. हा कावळा पापा, काका, ताई, आई, बाबा असे अनेक शब्द उच्चारतो. अगदी माणसासारखेच स्पष्ट उच्चार हा कावळा करताना दिसतो. तसेच कुटुंबातील व्यक्ती बोलत असताना त्याला प्रतिसादही हा कावळा देतो. या कावळ्याने सोशल मीडियावर चांगलाच धुमाकूळ घातला आहे. तसेच या कावळ्यामुळे पालघर जिल्ह्यात असलेले अतिदुर्गम भागातील गारगाव हे गाव देखील चर्चेत आले आहे.

# मुंबईकरांना मिळणार मोठी भेट!

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ३१ :**

मुंबईकरांसाठी एक आनंदाची बातमी आहे! मुंबई मेट्रोच्या बहुप्रतिक्षित मेट्रो लाइन ३ (अक्वा लाइन) चा दुसरा टप्पा येत्या १० एप्रिल २०२५ पासून प्रवाशांसाठी खुला होणार आहे.

या नव्या मार्गामुळे मुंबईतील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होईल आणि दैनंदिन प्रवास अधिक सुलभ आणि जलद होईल. हा मार्ग आरे ते आचार्य अत्रे चौक (वरळी) पर्यंतचा असून, यामुळे दक्षिण आणि मध्य मुंबईतील प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. या टप्प्याच्या उद्घाटनाची तयारी जोरात सुरू असून, मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड (एमएमआरसी) ने याबाबतची माहिती दिली आहे.

मेट्रो लाइन ३ चा हा दुसरा टप्पा ९.७ किलोमीटर लांबीचा आहे आणि यात सहा नवीन मेट्रो स्थानकांचा समावेश आहे.

# मालाड पूर्व भागात दोन गटांमध्ये तणाव



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३१ :**

मुंबईतील मालाड पूर्व भागात दोन गटांमध्ये तणाव निर्माण झाल्याची माहिती समोर आली आहे. प्रत्यक्षात काल संध्याकाळी कलश यात्रेदरम्यान घरी परतत असताना भगवा झेंडा फडकवल्याबद्दल विरोधी गटातील लोकांनी तरुणांना मारहाण केल्याचा आरोप केला जात आहे.

मालाड पूर्व, मुंबईतील पिंप्रीपाडा येथे गुढीपाडवा कलश शोभा यात्रेनंतर भगवा ध्वज घेऊन पठाणवाडीमार्गे दोन हिंदू मुले आपल्या घरी जात असताना ही घटना घडली.

पठाणवाडी भागात भगवा झेंडा फडकावताना काही मुस्लिम मुलांनी हिंदू तरुणांवर हल्ला केला असल्याचा आरोप यात केला जात आहे. पोलिसांची उपस्थिती असतानाही एका गटाने दोन्ही मुलांना बेदम मारहाण केली असल्याचा आरोप होतोय.

या प्रकरणी मुंबई पोलिसांनी अर्शन शेख आणि चार अज्ञातांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान, आरोपींवर कठोर कारवाई न केल्यास बजरंग दलाने पोलिस प्रशासनाला आंदोलनाचा इशारा दिला आहे.

मालाडमधील घटना गैरसमजुतीतून झाल्याची माहिती डीसीपी स्मिता पाटील यांनी दिली आहे. तसेच नागरिकांनी कोणत्याही अफवांना बळी पडू नये, असे आवाहनही डीसीपी पाटील यांनी केले आहे. डीसीपी पाटील म्हणाल्या, 9 ते 10 अनोळखी इसमांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याचा तपास सुरू असून सदर गुन्ह्यातील आरोपी निशापन्ना करून कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. पिंपरीपाडा परिसरात संपूर्णपणे शांतता राखण्यात येत असून नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की कोणत्याही अफवांना बळी पडू नये.

याप्रकरणी पीडित राजकुमार शंभूनाथ चोबे ( रा. संघर्ष नगर चांदवली, मुंबई) यांनी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. राजकुमारने तक्रारीत म्हटले आहे की, मी माझा मेहुणा अंकित चोबे याच्यासोबत माझा मित्र सुजित बोस याने पिंप्रीपाडा मालाड पूर्व येथे गुढीपाडव्यानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी जात होते. तिकडे जाण्याच्या वाटेवर आणखी काही मित्र माज्यासोबत आले होते. मालाड पूर्वेला पोहोचताच मुस्लिम मुलांनी आमच्यावर हल्ला केला.

हल्लेखोर मुस्लिम तरुण शिवीगाळ करत होते, तुम्ही लोक या गर्दीत का आलात? हल्ला करणाऱ्या तरुणाने पांढरा कुर्ता आणि जाळीदार टोपी घातली होती. माझे ओळखीचे सुजित शर्मा यांनी लगेच जवळच उभ्या असलेल्या पोलिस व्हॅनमध्ये जाऊन पोलिसांना घटनेची माहिती दिली.

यानंतर पोलिस तात्काळ घटनास्थळी आले आणि आमच्यावर हल्ला करणाऱ्या लोकांना कसेतरी वेगळे केले. यानंतर मला पोलिस व्हॅनमधून ट्रॉमा केअर हॉस्पिटल जोगेश्वरी पूर्व येथे उपचारासाठी नेण्यात आले. त्यानंतर घटनेचे व्हिडिओ फुटेज पाहिले असता मला लाकडी दांडक्याने मारहाण करणारा अर्शन शेख असल्याचे समजले. त्याच्यासोबत ८ ते १० मुलांचाही या घटनेत सहभाग होते. पोलिस आरोपीच्या शोध घेत आहेत.

# मुंबईच्या २ माजी सहाय्यक पोलिस आयुक्तांनी वकील नीलेश ओझा यांना दिला पुराव्यांचा पेनड्राइव्ह



■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ३१ :**

दिशा सालियन मृत्यू प्रकरणात सोमवारी एक महत्त्वपूर्ण घडामोड घडली. मुंबईच्या २ माजी सहाय्यक पोलिस आयुक्तांनी सोमवारी दिशाचे वडील सतीश सालियन यांचे वकील नीलेश ओझा यांची भेट घेऊन त्यांना या प्रकरणाशी संबंधित अत्यंत संवेदनशील माहिती व पुरावे असणारा पेनड्राइव्ह दिला. यामुळे या प्रकरणी काही महत्त्वाचे खुलासे होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

यासंबंधीच्या माहितीनुसार, ए. पी. निपुंगे व भीमराज घाडगे या २ माजी सहाय्यक पोलिस आयुक्तांनी सोमवारी नीलेश ओझा यांची भेट घेतली. यावेळी त्यांच्यासोबत दिशाचे वडील सतीश सालियनही उपस्थित होते. या भेटीत त्यांनी या घटनेशी संबंधित अत्यंत संवेदनशील व महत्त्वपूर्ण पुरावे असणारे पेनड्राइव्ह ओझा यांना सुपूर्द केले.

हे पुरावे दिशाच्या सामूहिक बलात्कार व हत्या तथा हे प्रकरण दाबून टाकण्याप्रकरणी होणाऱ्या आरोपांतील कथित परस्पर संबंध जोडण्यात महत्त्वाची भूमिका बजावतील असे सांगितले जात आहे.

या पुराव्यांत फोटो, व्हिडिओ रेकॉर्डिंग, स्टिंग ऑपरेशन फुटेज व इतर अनेक महत्त्वाच्या दस्तऐवजाचा समावेश आहे. हे सर्व पुरावे मुंबईचे तत्कालीन पोलिस आयुक्त परमबीर सिंह व इतर आरोपींकडे अंगुलीनिर्देश करणारे आहेत, असे सांगितले जात आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, माजी पोलिस अधिकाऱ्यांनी सुपूर्द केलेल्या या सामग्रीमुळे दिशा प्रकरणातील अनेक गुन्हेगारी कृत्यांचा पदार्फाश होतो. त्यात हत्येला आत्महत्या भासवण्यासाठी पोस्टमार्टम रिपोर्टमध्ये जाणिवपूर्वक करण्यात आलेल्या फेरफारांचा समावेश आहे. त्यामुळे दिशा सालियन प्रकरणाच्या तपासात हे पुरावे महत्त्वाची भूमिका बजावण्याची शक्यता आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे दिशा सालियनच्या वडिलांनी नुकतीच मुंबईच्या अतिरिक्त पोलिस आयुक्तांची भेट घेऊन आपल्या मुलीच्या हत्येची सखोल चौकशी करण्याची मागणी केली होती. आदित्य ठाकरे यांच्या भूमिकेची चौकशी करण्याची मागणी करत उद्धव ठाकरे यांनाही सहआरोपी करण्याची तक्रार नोंदवली होती.



सामाजिक सलोखा जपणारा रमजान: मुर्तिजापुरचा प्रेरणादायी उपक्रम

# बंधूभावाची साक्ष: हिंदू-मुस्लिम एकतेने सजलेला रमजान उत्सव



▪मुर्तिजापुर,दि ३१ (प्रतिनिधी): रमजाननिमित्त पठाणपुरा ईदगाहवर मुस्लिम समाजाने शांततेत सामूहिक नमाज अदा केली. मौलाना उस्मान यांनी नमाज पठण केले तर मुफ्ती मुंताजीम यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. या ठिकाणी हजारो मुस्लिम बांधवांनी सामूहिक नमाज अदा करत राष्ट्रीय एकता अबाधित राहावी, असा संदेश दिला. 'धर्म ही वैयक्तिक श्रद्धा असली तरी सामाजिक सलोखा आणि ऐक्य यावरच समाजाचा पाया मजबूत असतो' असा प्रेरणादायी संदेशही यावेळी देण्यात आला.

यानंतर स्टेशन परिसरातील मशीदसमोर हिंदू समाजबांधवांनी मुस्लिम बांधवांचे पुष्पगुच्छ आणि दुपट्ट्यांनी हार्दिक स्वागत करून सामंजस्याचा संदेश दिला. 'गर्वसे कहो, हम सब एक हैं!' या घोषवाक्याने हिंदू-मुस्लिम ऐक्याचे दर्शन घडवले.

या स्वागत समारंभात अँड. नसिर शेख यांच्या अध्यक्षतेखाली मौलाना जाहेद आलम, ज्येष्ठ समाजसेवक मो. इलियास मास्टर, पत्रकार अन्वर खान, मन्सूर राही, अँड. उजैर अहमद आदी मान्यवर उपस्थित होते. नुकतेच न्यायाधीश पदी नियुक्त झालेल्या अँड. उजैर अहमद यांचा यावेळी विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमात बोलताना अँड. नसिर शेख यांनी सांस्कृतिक ऐक्य आणि शांततेचे महत्त्व स्पष्ट केले. त्यांनी असे सांगितले की, 'समाजात सुसंवाद आणि समजूतदारपणा असला की कोणतीही अडचण सोडवता येते.' मौलाना जाहेद आलम यांनी धार्मिक सलोख्याचे महत्त्व अधोरेखित केले. उपस्थित मान्यवरांनीही समाजातील ऐक्य आणि सद्भावना वाढवण्याचा निर्धार व्यक्त केला.

# मशीद व ईदगाह वर ईदची नमाज ईद-उल-फितर उत्साहात साजरी

▪अकोला,दि ३१ (प्रतिनिधी): ईद उल फितर सण सोमवारी अकोला शहरात उत्साह आणि बंधुत्वाच्या वातावरणात साजरा करण्यात आला. शहरातील सर्व मशिदी आणि ईदगाहमध्ये हजारो मुस्लिम बांधवांनी ईदची नमाज अदा करून अल्लाहचे आभार मानले. आ. साजिद खान पठाण, जिल्हाधिकारी अजित कुंभार आणि पोलिस अधीक्षक बच्चन सिंग यांनी प्रशासनाच्या वतीने मुस्लिम बांधवांचे स्वागत केले.



अकोल्यातील हरीहरपेठेतील ईदगाहसह कच्छी मशिदीत ईद- उल-फितरच्या दोन नमाज आयोजित करण्यात आल्या. ज्यात मोठ्या संख्येने मुस्लिम बांधव सामील होते. पहिली जमात सकाळी ८:४५ वाजता पार पडली, ज्याची इमामत प्रसिद्ध इस्लामी विद्वान मुफ्ती मो. सादिक अख्तर रजवी मर्कजी यांनी केले. दुसरी जमात सकाळी ९:४५ वाजता आयोजित पकरण्यात आली, ज्यामध्ये नायब इमाम मौलाना आरिफ रजा यांनी नमाज पढवली. दोन्ही नमाजा नंतर ईदच्या आनंदात सामील झाले. नमाजानंतर कच्छी मशिदीचे अध्यक्ष जावेद जकरिया यांनी सर्वांना ईदच्या शुभेच्छा दिल्या. तसेच, अहले सुन्नत जमातचे अध्यक्ष हाजी मुदाम खान यांनी देखील ईदच्या शुभेच्छा देऊन समाजात बंधुत्व, प्रेम आणि सौहार्द टिकवण्याचा संदेश दिला.अकोल्यातील ऐतिहासिक हरिहरपेठ ईदगाह, खदान ईदगाह, अकोट फ्फाइल ईदगाह, नायगाव ईदगाह, शिवनी ईदगाह याशिवाय, शहरातील सर्व मशिदींमध्येही ईदची नमाज अदा करण्यात आली.

# मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना, जिल्ह्यातील आठशे नागरिकांना विशेष रेल्वेने अयोध्या दर्शन

▪अकोला,दि ३१ (प्रतिनिधी): मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना अंतर्गत ११ एप्रिल रोजी अकोला जिल्ह्यातून ८०० जेष्ठ नागरिक विशेष रेल्वे दवारा अयोध्या श्रीरामाच्या दर्शनासाठी जात असून खासदार अनुप धोत्रे, आमदार रणधीर सावरकर हिरवा कंदील दाखवून रेल्वे यात्रे यांना रवाना करणार आहे. महायुती सरकारने ज्येष्ठ नागरिकांना तीर्थयात्रेचा लाभ व्हावा यासाठी ३०००० रुपयांचा निधी मंजूर केला आहे आणि त्या अंतर्गत अकोला जिल्ह्यातील समाज कल्याण विभागाच्या म ाध्यमातून ८००ज्येष्ठ नागरिकांना ११ एप्रिल ते पंधरा एप्रिल पर्यत अयोध्या दर्शनाचा लाभ अयोध्या काशी प्रयाग्रज या यात्रेचा



दर्शनाचा लाभ होणार आहे. यावेळी जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार आकाश फुंडकर हे सुद्धा प्रामुख्याने उपस्थित राहणार असून जिल्ह्यातील आमदार प्रकाश भारसाकले, आमदार हरीश पिंपळे आमदार अमोल मिटकरी आमदार वसंत खंडेलवाल जिल्हाधिकारी अजित कुंभार डॉक्टर अनिता राठोडहे सुद्धा यावेळी उपस्थित राहणार आहे.साठ वर्षाच्या ज्येष्ठ नागरिकांनी महाराष्ट्र शासनाकडे व जिल्हाधिकारी मार्फत ऑनलाईन अर्ज केले होते त्यांच्यापैकी ८०० लोकांचा पहिली अकोला जिल्ह्यातील यात्रांची तयारी पूर्ण झाली असून ११ ते १५ एप्रिल पर्यत हे भाविक भक्त तीर्थयात्रा करणार आहे रेल्वे स्टेशनवर भारतीय जनता पक्षाच्या वतीने ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार व अभिनंदन करण्यात येणार असून या कार्यक्रमात सर्व धर्मप्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे अशी विनंती किशोर पाटील जयंत मसने, विजय अग्रवाल, लोकेश तिवारी माधव मानकर गिरीश जोशी, राजू धोटे, टोल मारे महाराज, धोतरकर गुरुजी यांनी केली.

# पातूर तालुक्यात चोरीच्या घटनात वाढ

## श्वान पथक आणि फिंगरप्रिंट तज्ञांना पाचारण

▪पातुर,दि ३१ (प्रतिनिधी): तालुक्यात चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाल्यामुळे पोलीस प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. पातूर पोलीस स्टेशन अंतर्गत मळसूर गावात प्रमोद प्रभाकर देवकते यांच्या घरात मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी २ लाख १० हजार रुपयांचे सोने-चांदीचे दागिने आणि रोख रक्कम लंपास केली.तालुक्यात चोरीच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असून पोलीस प्रशासनाच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केल्या जात आहे. पातूर तालुक्यातील पोलिस स्टेशन चांनी अंतर्गत येत असलेले मळसुर या गावीतील रहिवाशी प्रमोद प्रभाकर देवकते यांच्या राहत्या घरी काही अज्ञात चोरट्यांनी



त्यांच्या घरातील डब्यातून सोने, चांदीचे दागिने व काही नगदी रुपय असे अंदाजी २ लाख १० हजार रुपयाचा मुद्देमाल लंपास केला. सदरचा प्रकार सकाळच्या सुमारास देवकते यांच्या निर्देशनास आला.

देवकते यांनी या बाबतची माहिती चांनी पोलिसांना दिली असून घटना स्थळी श्वान पथक व फिंगर प्रिंट एक्सपर्ट टीम ला पाचारण करण्यात आले आहे, सदर घराच्या आजू बाजूला जंगलाचा परिसर असल्याने चोर जंगलात पळून गेले असल्याचा अंदाज गावकऱ्यांनी व्यक्त केला असून पुढील तपास चान्नी पोलीस करीत आहे.

# अकोला मार्गे हैदराबाद भावनगर-हैदराबाद विशेष रेल्वे

▪अकोला,दि ३१ (प्रतिनिधी): उन्हाळ्यामध्ये प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेता, दक्षिण मध्य रेल्वेने हैदराबाद आणि भावनगर टर्मिनसदरम्यान एक विशेष रेल्वे चालवण्याचा निर्णय घेतला आहे. ही विशेष रेल्वे नांदेड, अकोला, भुसावळ आणि अहमदाबाद मार्गे धावणार आहे,ज्यामुळे प्रवाशांना अतिरिक्त पर्याय उपलब्ध होणार आहेत. या विशेष रेल्वेसाठी आरक्षण ३० मार्च रोजी सकाळी ८:०० वाजता सुरू झाले आहे. प्रवासी अधिकृत रेल्वे बुकिंग प्लॅटफॉर्मवरून तिकीट बुक करू शकतात. ट्रेन क्रमांक ०७०६१ हैदराबाद भावनगर टर्मिनस स्पेशल हैदराबादहून दर शुक्रवारी १९ वाजता सुटेल, शनिवारी ९ वाजता अकोला येथे पोहोचेल आणि रविवारी ५ वाजता भावनगर टर्मिनस येथे पोहोचेल. ही सेवा ४ एप्रिल ते २७ जूनपर्यंत उपलब्ध असेल. परतीच्या प्रवासासाठी, ट्रेन क्रमांक ०७०६२ भावनगर टर्मिनस हैदराबाद स्पेशल भावनगर टर्मिनस येथून दर रविवारी १०:१५वाजता सुटेल, सोमवारी ०३:४० वाजता अकोला येथे पोहोचेल आणि सोमवारी १६:४५ वाजता हैदराबादला पोहोचेल. ही सेवा ६ एप्रिल ते २९ जूनपर्यंत उपलब्ध असेल. प्रवाशांना त्यांच्या प्रवासाच्या योजना निश्चित निश्चित करण्यासाठी लवकर तिकीट बुक करण्याचा सल्ला देण्यात आला आहे. अधिक माहितीसाठी, ते भारतीय रेल्वेच्या अधिकृत वेबसाइटला भेट देऊ शकतात किंवा रेल्वे चौकशी सेवांशी संपर्क साधू शकतात.

# इफ्तार पार्टी हा एकता सद्भावनेचा संदेश: आ.अमोल मिटकरी

## फरहान अमीन यांच्यावतीने इफ्तार पार्टचे आयोजन

▪पातूर,दि ३१ (प्रतिनिधी): इफ्तार पार्टी हा एकता सदभावनेचा संदेश असून अशी इफ्तार पार्टी भविष्यात ही आयोजित करण्यात यावे अशे प्रतिपादन विधानपरिषद सदस्य आमदार अमोल मिटकरी यानी केले. स्थानिक पातुर येथील असलेले होटल ग्रन्ड महेफिल येथे इफ्तार पार्टी चे आयोजन राष्ट्रवादी व विद्यार्थी काँग्रेसचे प्रदेश सचिव फरहान अमिन यानी केले होते या इफ्तार पार्टी मध्ये शहरातील विभीन्न क्षेत्रातील तथा




विभिन्न समाजाचे नागरिकाची उपस्थिती होती मंचावर कार्यक्रम ाचे अध्यक्ष आमदार अमोल मिटकरी तर प्रमुख अतिथी आयुर्वेद महाविध्यालयाचे संचालक डा. साजिद शेख, सामाजिक कार्यकर्ते धनंजय मिश्रा, प्रशांत निकम अ करिम सर, डा वकार अन्सारी, किराणा असोसिएशनचे अब्दुल कुदुस,डाक्टर असोशिएशन चे अध्यक्ष डा नंदकिशोर राऊत अ भा मराठी पत्रकार संघांचे तालुका अध्यक्ष सतिश सरोदे आदि उपस्थिती होती कार्यक्रमाचे संचालन धनंजय मिश्रा यानी केले आभार प्रदर्शन फरहान अमिन यानी केलेकार्यक्रमाचे यशा करिता नातिक शेख, सैय्यद साद, सय्यद फैजान, नाझिम शेख, तौकिर अहेमद, खिजर खान यानी परिश्रम केले.

# आढळला काटेपूर्णा धरणात सुरक्षा रक्षकाचा मृतदेह

▪अकोला,दि ३१ (प्रतिनिधी): काटेपूर्ण धरणावरील सुरक्षा रक्षकाचा मृतदेह आढळल्याने एकच खळबळ उडाली. धरणात व्यक्ती बुडाल्याची माहिती महान पोलिस चौकीमधील पोलिसांनी पिंजर पोलिस स्टेशनचे ठाणेदार गंगाधर दराडे यांना दिली. त्यांनी मानव सेवा आपत्ती बचाव पथकाचे प्रमुख दीपक सदाफळे यांना माहिती दिल्यानंतर त्यांनी व सुरक्षा रक्षक कुणाल नागपुरे (२३) यांचा मृतदेह पाण्याबाहेर काढला. यानंतर मृतदेह मूर्तिजापूर येथील शासकीय रुग्णालयात शवविच्छेदनाकरिता पाठविल्याची माहिती ठाणेदार गंगाधर दराडे यांनी दिली.

# तेल्हारा तालुक्यात ईद उत्साहात साजरी

▪तेल्हारा,दि ३१ (प्रतिनिधी): हिंदू बांधवांनी दिल्या ईद च्या शुभेच्छा. तेल्हारा तालुक्यात रमजान ईद मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली यावेळी तालुक्यात विविध ठिकाणी पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

तेल्हारा तालुक्यात रमजान ईद उत्साहात साजरी करण्यात आली यावेळी तेल्हारा शहर हिवरखेड अडगाव पचंगव्हाण तळेगाव बाजार माळेगाव गोर्धा येथे रमजान ईद उत्साहात साजरी करण्यात आली सकाळी दहा वाजता जामा मस्जिद मध्ये नमाज अदा करण्यात आली नमाज नंतर हिंदू बांधवांनी मुस्लिम बांधवांना ईद च्या शुभेच्छा दिल्या. तालुक्यातील



तळेगाव बाजार येथे रमजान ईद साजरी करण्यात आली यावेळी तळेगाव बाजार येथील माजी पोलीस पाटील भाऊसाहेब खारोडे मधुकरराव ठोंबरे रावसाहेब खारोडे सदानंद खारोडे उध्दव मानखैर सेवा सहकारी सोसायटी चे अध्यक्ष किशोर खारोडे हिंमत पाटील सागर मानखैर गोलु खारोडे मयुर खारोडे देवेंद्र भड. यांनी मुस्लिम बांधवांना शुभेच्छा दिल्या यावेळी जामा मस्जिद चे अध्यक्ष रशिद शा वायदभाई मो ईदरिस रफिकभाई मुजफ्फर भाई क्षमाभाई मो सिद्दिक साजिद खा जम्मुभाई नाशिरखा पठाण बबलुभाई भुराभाई सह गावातील मुस्लिम समाज मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## थोडक्यात

### पिंजर येथील शेतकऱ्यांची आत्महत्या

▪बार्शिटाकळी,दि ३१ (प्रतिनिधी): बार्शिटाकळी तालुक्यातील पिंजर येथील शेतकरी शंकरराव रामकृष्ण वानखडे (६०) यांनी भेंडगाव शेतशिवारातील शेतात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना २८ मार्चला उघडकी आली. या बाबतची माहिती पिंजर पोलिस स्टेशनचे ठाणेदार गंगाधर दराडे यांनी दिली आहे. तसेच या शेतकऱ्याकडे जनता बँक व गटाचे कर्ज होते. ते कर्ज कसे फेडायचे, या विचारात व तणावात ते नेहमी राहत असल्याची माहिती कुटुंबीयांनी दिली. त्यांचे पश्चाप पत्नी, दोन मुले व एक मुलगी असा परिवार आहे. शासनाने तत्काळ सदर शेतकऱ्याचे कर्जमाफ करून त्यांना आर्थिक मदत द्यावी, अशा प्रकारची मागणी होत आहे.

### विद्यार्थ्यांची विशेष आरोग्य तपासणी

अकोला : राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम अंतर्गत डीइआयसी येथे अंगणवाडी व शालेय विशेष तपासणी मोहीम २.० आरोग्य तपासणी करण्यात आली. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. तरंगतुषार वारे, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम यांच्या माध्यमातून डी. इ. आय. सी येथे, अंगणवाडी व शालेय विशेष तपासणी मोहीम २.० तपासणी मोहिम राबविण्यात आली. या मोहिमेत मेंदूशी संबंधित विकार असलेल्या रुग्णांकरता न्यूरो फिजिशियन यांचा संदर्भित शिबीर घेण्यात आला. शिबीरात डॉ. कोमल घाटोळ, यांच्या माध्यमातून मुलांची तपासणी करून संदर्भित सेवा दिली.

# अवैध गौण खनिज चोरट्यांचा धुमाकूळ

▪वाडेगाव,दि ३१ (प्रतिनिधी): येथील निर्गुना नदी पात्रातून वाळू, माती, मुरूम सरीसपणे सुरु असून शासनाचा लाखो रुपयाचा महसूल बुडत आहे. तरी अधिकारी याकडे दुर्लक्ष करीत असल्या मुळे येथील जनता अचंभीत झाली आहे. रात्रभर ट्रॅक्टर मध्ये गौण खनिज भरून वाहतूक केली जाते. हे ट्रॅक्टर चालक यातील बरेच जण दारू पिऊन ट्रॅक्टर चालवतात अशोक नगर दलित वस्ती मधून छोट्या रस्त्यातून जोरात ट्रॅक्टर चालवतात रस्त्यात लोकं झोपलेले असतात. गुरे ढोरे रस्त्यावर असतात विशेष म्हणजे लहान लेकरे या रस्त्यावर खेळत असतात. एखादा अपघात झाला तर कोण जबाबदारी घेईल? असा प्रश्न उपस्थित झाला आहे. रात्री तलाठी, मंडळ अधिकारी, ठाणेदार यांना माहिती दिली असता. कोणीही प्रतिसाद दिला नाही. यावरून असे दिसते की, सब मिली भगत आहे. शासनाला लाखो रुपये चुना लावणाऱ्याचा बंदोबस्त करून दलित वस्तीतील लोकांना सुखासमाधानाने रात्री झोपू द्यावे अशी मागणी होत आहे.

## राजमाता अहिल्यादेवी होळकरांची जीवन गाथा

# घरा घरात पोहचवण्याचे काम रामनवमी शोभायात्रा करत आहे : अर्चना शर्मा

▪अकोला,दि ३१ (प्रतिनिधी): विश्व हिंदू परिषद, श्रीराम नवमी शोभायात्रा समिती व श्री जानकी वल्लभ मातृशक्ती सत्संग मंडळ अकोला यांच्या माध्यमातून शहरातील विविध भागात रामनवमीनिमित्त भजन संस्थेचे कार्यक्रम घेण्यात येत आहे त्यानिमित्त दिनांक २९ /३ /२०२५ ला डाबकी रोड स्थित जुने शहर गिताई मंगल कार्यालय येथे सामूहिक हनुमान चालीसा पठाण भजन संध्या सौ ज्योती शर्मा यांच्या सुमधुर वाणीतून करण्यात आले व अहिल्याबाई होळकर यांच्या जीवन चरित्रावर नाट्यात्मय नाटिका नृत्यरंजन कथ्थक अकॅडमी प्रियंका जोशी यांच्या संचाने सादर केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अर्चना शर्मा यांनी केले कार्यक्रमाकरिता सौ सुहासनी ताई धोत्रे, मंजुशाताई सावरकर, चंदाताई



शर्मा,मीना कागरीवाल,मनिषा अनासने सुमन ताई गावंडे या मान्यवरांची उपस्थिती होती कार्यक्रम करिता ज्योती टोपरे, मनीषा भुसारी रेखा नालट सारिका देशमुख ,चित्रा बापट,छाया थोडसं चंदा ठाकूर कल्पना अडसुले मालती रणपिसे सुरेखा नबापुरे , संतोष शर्मा, वैशाली शेगोकर, नीता बागडे, अलका देशमुख,संगीता मांगते,सोनल शर्मा यांनी अथक परिश्रम घेतले कार्यक्रम करीता रुक्मिणी पुरी,मीरा वानखडे, सौ दिपिका चोपडे ,मनिषा देशपांडे, प्रीती गुखुद्दे आभार प्रदर्श पुष्पा वानखडे यांनी केले.

# बाल संस्कार हे योग्य दिशेने टाकलेले पहिले पाऊल होय : ज्ञानेश्वर महाराज वाघ

▪अकोला,दि ३१ (प्रतिनिधी): मानवी जीवन हे संस्कारक्षम असून, त्याला योग्य दिशा मिळण्याकरिता एका सुयोग्य मार्गदर्शकाची नितांत गरज असते. तो मिळावा म्हणूनच अनेक जण आजन्म त्याचा शोध घेत असतात. परंतु त्यांच्या पदरी सदैव निराशाच पडत असते.

त्याची सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे मुळातच शोधण्याची चुकलेली पद्धत होय . योग्य दिशेने पाऊल टाकल्यानंतर मार्गदर्शक शोधावा लागत नसून तो मिळतच असतो. बालसंस्कार हे उच्च ध्येयाप्रत पोहोचण्याच्या दृष्टिकोनातून योग्य दिशेने टाकलेले पहिले पाऊल होय असे



अनुभवपूर्ण मत भागवताचार्य श्री ज्ञानेश्वर महाराज वाघ यांनी मांडले. ते आज श्री संत वासुदेवजी महाराज स्मृति मंदिर श्री ज्ञानेश आश्रम वारी भैरवगढ येथे साडेतीन मुहूर्तांपैकी एक पूर्ण मुहूर्त असलेल्या गुढीपाडवा नामक मराठी नूतन वर्षाच्या निमित्ताने बहुसंख्येने दर्शनाकरिता आलेल्या पालक व बालक यांच्याशी अनौपचारिक रित्या सुसंवाद साधत असतांना बोलत होते. ते पुढे म्हणाले की, जे पालक स्वतःच्या बालकांना जागतिक स्पर्धेत टिकण्याच्या नावाखाली त्याला त्यांच्या संस्काररूपी न्याय हक्कापासून वंचित करीतात ते स्वतःच स्वतःच्या हाताने वृद्धाश्रमाचे आरक्षण निश्चित करीत असतात.

भारतासारख्या संस्कृतीनिष्ठ देशांमध्ये अनाथाश्रम आणि वृद्धाश्रम निर्माण होणे हे फार मोठी शोकांतिका असून, या समस्येवर वेळीच मात करायची असेल तर बालसंस्काराशिवाय दुसरा योग्य पर्याय नाही. भारतीय संस्कृती ही वर्णाश्रमानी युक्त असून ; ब्रह्मचारी व गृहस्थ या दोन आश्रमांचे नियम योग्य पद्धतीने न पाळल्या गेल्यामुळे त्यातून अनाथाश्रम तर, वानप्रस्थ आणि संन्यास या आश्रमांची नियमावली न सांभाळल्याने त्यातून वृद्धाश्रम निर्माण होऊन आज रोजी आश्रम संख्या चार वरून सहा झाल्याचे निदर्शनास येते.

म्हणून आपली संतती ही म्हातारपणात आपल्या संतापाची नाही तर , सांभाळण्याची व्यवस्था व्हावी असे वाटत असणाऱ्या सुज्ञ मातापित्यांनी प्रत्येक बालकाला बालपणीच संस्काराचे बाळकडू पाजून त्याला न चुकता संस्कृतीच्या शक्तीवर्धक जन्म घुट्टीची मात्रा दिली पाहिजे. तरच तो म्हातारपणात आपल्या आज्ञेचे पालन व आपले पोषण करेल.त्याकरिता शुभस्य शिघ्रम या न्यायाने या शुभकार्याचा तात्काळ शुभारंभ करून येत्या १ मे ते २० मे २०२५ पर्यत श्री ज्ञानेश आश्रम येथे आयोजित श्री माऊली सर्वांगीण विकास बालसंस्कार शिबिरामध्ये आपल्या पाल्यांना पाठविले पाहिजे.तसेच या कार्याकरिता तन-मन-धनाने सरळ हाताने मदत करण्याचे आवाहन सुद्धा महाराजांनी यावेळी उपस्थितांना केले. असे शिबिर व्यवस्थापक श्री ज्ञानेश्वर महाराज भालतिलक हे कळवितात.

# आधी बुलडोझर.. आता सौगात!

देशभरात मंगळवार ३१ मार्च रोजी रमजान ईद मोठ्या उत्साहात साजरी झाली. यावर्षीच्या ईदचे वैशिष्ट्य म्हणजे कायमच मुसलमानांचा विरोध करणाऱ्या भाजपा सरकारने सौगात ए मोदी या नावाखाली देशभरातील ३२ लाख मुस्लिम कुटुंबांना अन्न धान्याचे कीट वाटप केले. गरीब मुस्लीमांना मदत करणे हा उद्देश असल्याचे सांगण्यात येत असले तरी प्रत्यक्षात यामागे बिहार आणि पश्चिम बंगाल राज्यात होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुका असून, काँग्रेस आणि इतर पक्षांवर मुस्लीमांचे तुष्टीकरण करण्याच्या आरोप करणाऱ्या भाजपाने मुस्लीम मतांसाठी खेळलेली ही नवी खेळी आहे.

---

'बटेंगे तो कटेंगे' हा नारा देणारे आता 'सौगात ए मोदी' म्हणत आहेत. पण ही योजना 'सौगात ए मोदी' नाही तर 'सौगात ए सत्ता' असल्याची टीका उद्धव ठाकरे यांनी केली. यावर भाजप खासदार अशोक चव्हाण यांनी पलटवार केला. त्यांनी असे विधान करायला नको होते. हा उपक्रम अल्पसंख्यांक समाजाला विश्वास देण्यासाठी असल्याचे ते म्हणाले. दुसरीकडे, उद्धव ठाकरे यांनी योग्यच टीका केली असल्याचा दावा ठाकरे गटाच्या खासदार प्रियंका चतुर्वेदी यांनी केला.

भाजपच्या 'सौगत-ए-मोदी' उपक्रमावर उद्धव ठाकरे यांच्या 'सौगत-ए-सत्ता' या टिप्पणीवर भाजप खासदार अशोक चव्हाण म्हणाले की, ₹त्यांनी असे विधान करायला नको होते. त्यांना असे वक्तव्य शोभत नाही. मोदीजींचा हा उपक्रम अल्पसंख्याकांना विश्वास देण्यासाठी आहे. या सणाच्या निमित्ताने सर्वांना शुभेच्छा देण्याची परंपरा आहे. त्यामुळे अल्पसंख्यांक समाजाला कोणी शुभेच्छा देत असेल तर त्यात चुकीचे काय? असा प्रश्नही त्यांनी विचारला आहे.

शिवसेना नेत्या मनीषा कायंदे म्हणाल्या की, मोदींनी त्यांच्या कार्यकाळात कधीही कोणत्याही मुस्लिमांवर अत्याचार केले नाहीत. खरं तर, त्यांनी सर्वांना न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. तर महाविकास आघाडी (महाविकास आघाडी) नेहमीच मुस्लिमांचे तुष्टीकरण करण्याचा प्रयत्न करत होती.

उद्धव ठाकरे यांच्या 'सौगत-ए-मोदी' वरील वक्तव्यावर त्यांच्या गटाच्या खासदार प्रियंका चतुर्वेदी म्हणाल्या की, अल्पसंख्यांक समाजाला वेगवेगळ्या प्रकरणात त्रास दिला जातो. आणि आता ईद आल्यानंतर 'सौगत-ए-मोदी' उपक्रम राबवण्यात येत आहेत.

वास्तविक 'सौगत-ए-मोदी' म्हणजे काय? या भेटवस्तू करदात्यांच्या पैशाने वाटल्या जात आहेत आणि त्याचे श्रेय पंतप्रधान मोदींना जाते. उद्धव ठाकरे यांनी हा फरक स्पष्ट केला असल्याचे चतुर्वेदी यांनी म्हटले आहे.

या संदर्भात उद्धव ठाकरे म्हणाले होते की, भाजपने सौगात ए मोदी ही योजना सुरू केली आहे. पण ही योजना सौगात ए मोदी नाही तर सौगात ए सत्ता आहे. बटेंगे तो कटेंगे हा नारा देणारे आता सौगात ए मोदी म्हणत आहेत. मोदी सुरुवातीला मंगळसूत्र धोक्यात आहे, आता हिंदूंचे संरक्षण कोण करणार? असे म्हणाले.

जे लोक आमच्या हिंदुत्त्वावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत आहेत ते आता काय म्हणतील. भाजपने आता आपण हिंदुत्व सोडल्याची घोषणा करावी. भाजपने प्रथम विष वाटले, आता धान्य वाटत आहेत. ही चांगली गोष्ट आहे. पण त्यांनी आपले हिंदुत्व सोडले का किंवा त्यांची ही योजना केवळ बिहार निवडणुकीपर्यंतच राहणार का? हे भाजपने स्पष्ट करावे, असे उद्धव ठाकरे म्हणाले. एकीकडे हे सौगात ए मोदी अभियान राबवत आहेत. तर दुसरीकडे नमाजावर बंदी घालत आहेत. ही बंदी नितीशकुमार यांच्या बिहारमध्येही घालणार काय? भाजपने हिंदुत्व सोडले की, हे केवळ निवडणुकीचे नाटक आहे? असा प्रश्न ठाकरे यांनी यावेळी उपस्थित केला.

भाजपने मंगळवारी सौगत-ए-मोदी मोहीम सुरू केली. याअंतर्गत, देशभरातील ३२ लाख वंचित मुस्लिमांना ईद साजरी करण्यासाठी विशेष किट देण्यात आलेत . भाजपच्या अल्पसंख्याक आघाडीने या मोहिमेची जबाबदारी घेतली.

देशातील ३२ हजार मशिदींसह आघाडीचे ३२ हजार कार्यकर्ते गरजूंना हे किट पोहोचवतील. यासाठी प्रत्येक मशिदीतील १०० लोकांना मदत करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले होते.

सौगत-ए-मोदी किटमध्ये कपडे आणि खाद्यपदार्थ आहेत. यामध्ये महिलांसाठी सूट, पुरुषांसाठी कुर्ता-पायजमा, डाळी, तांदूळ, शेवया, मोहरीचे तेल, साखर, कपडे, सुकामेवा आणि खजूर यांचा समावेश आहे. प्रत्येक किटची किंमत सुमारे ५०० ते ६०० असल्याचे सांगितले जाते.

भाजप अल्पसंख्याक मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष जमाल सिद्दीकी म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी प्रत्येक सणाच्या आणि सर्वांच्या आनंदाच्या उत्सवात सहभागी होतात. आम्ही प्रत्येक सण रंगांनी भरलेला बनवण्याचा प्रयत्न करत आहोत. आज आम्ही सौगत-ए-मोदी किटचे वाटप करत आहोत, कारण हा रमजान महिना आहे. प्रत्येकाच्या श्रद्धेचा आदर केला पाहिजे.

पवित्र रमजान महिना आणि ईद, गुड फ्रायडे, ईस्टर, नौरोज या निमित्ताने अल्पसंख्याक मोर्चा 'सौगत-ए-मोदी' मोहिमेद्वारे गरजूंपर्यंत पोहोचेल. जिल्हा पातळीवरही ईद मिलन उत्सवाचे आयोजन केले जाईल.

अल्पसंख्याक आघाडीचे राष्ट्रीय मीडिया प्रभारी यासिर जिलानी म्हणाले की, ही मोहीम मुस्लिम समुदायामध्ये भाजपच्या कल्याणकारी योजनांचा प्रचार करण्यासाठी आहे. याद्वारे, भाजप आणि एनडीएसाठी राजकीय पाठिंबा मिळवणे हे उद्दिष्ट आहे.

भाजप नेत्या आणि दिल्ली हज समितीच्या अध्यक्षा कौसर जहाँ म्हणाल्या, पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली हा आणखी एक चांगला उपक्रम आहे. तुम्ही पाहिले असेलच की भाजप सरकार सत्तेत आल्यापासून, आम्ही समाजाच्या शेवटच्या टप्प्यावर उभ्या असलेल्या व्यक्तीलाही कोणताही भेदभाव न करता सोबत घेतले आहे, जो आमचा मूळ मंत्र आहे, सबका साथ, सबका विकास. हे त्याला दर्शवते.

भाजप नेते मुख्तार अब्बास नक्वी म्हणाले, नरेंद्र मोदींचा विकास अजेंडा कधीही मतांसाठीचा सौदा नव्हता. गेल्या ११ वर्षांत त्यांनी समाजातील तळागाळातील लोकांच्या जीवनात आनंद आणण्याचे काम केले आहे.

केंद्रीय मंत्री चिराग पासवान म्हणाले- पंतप्रधान नरेंद्र मोदी 'सबका साथ, सबका विकास' वर विश्वास ठेवतात. या विचाराने, केंद्र सरकार आणि बिहार सरकार विकासाच्या दिशेने काम करत आहेत.

**राजकारण की मन परिवर्तन?**

अपक्ष खासदार पप्पू यादवः हे राजकारण आहे की मन परिवर्तन? हे कसले प्रेम आहे? देव त्यांना बुद्धी देवो आणि त्यांनी संविधान स्वीकारावे. त्यांनी द्वेषाच्या राजकारणापासून दूर राहिले पाहिजे.

काँग्रेस खासदार रणजित रंजनः बिहारमध्ये निवडणुका आहेत, ते 'सोगत' किट देत नाहीत, तर याद्वारे मते मागत आहेत. जर त्यांना बिहारला 'भेट' द्यायची असेल तर त्यांनी बिहारमधून होणारे स्थलांतर थांबवण्यासाठी नोकऱ्या उपलब्ध करून द्यायला हव्यात.

सपा प्रमुख अखिलेश यादव म्हणाले, भाजप आणि त्यांच्या लोकांनी प्रत्येक सण साजरा केला पाहिजे. समाजवाद्यांचा नेहमीच असा विश्वास राहिला आहे की सर्व सण साजरे केले पाहिजेत, मग ते कोणत्याही धर्माचे असो. भाजप आता हा सण मोठ्या प्रमाणात साजरा करत आहे ही आनंदाची बाब आहे. भाजप हा असा पक्ष आहे, जो मतांसाठी काहीही करू शकतो.

खासदार कीर्ती आझाद म्हणाले, तुम्ही मगरीचा चेहरा पाहिला आहे का? तो प्राणी हसत असल्याचे दिसते, पण जेव्हा तुम्ही त्याच्या जवळ जाल, तेव्हा तो तुम्हाला गिळंकृत करेल. भाजपचीही तीच परिस्थिती आहे. जगाला त्याच्या कारनाम्यांबद्दल माहिती आहे, पण त्याच्याकडे दाखवण्यासाठी काहीही नाही. हा आजच्या काळातील सर्वात मोठा विनोद आहे.

एकूणच काय तर मोदींच्या सौगात ए मोदीवर विरोधकांनी सडकून टीका केली तर भाजपा आणि त्यांच्या मित्रपक्षांनी याला चांगला उपक्रम म्हटल आहे . परंतु, उत्तर प्रदेश, आणि अन्य राज्यात जेथे भाजपाची सत्ता आहे, तेथे मुस्लीमांची अवस्था काय? या लोकांच्या घरावर बुलडोझर चालविले गेले, मॉब लिचींगची प्रकरणे झालीत . आता त्याच मुस्लीमांना गोंजारण्याचे काम करावे लागत आहे.

■ ■ ■

# हौतात्म्यामुळे अजरामर पराक्रमी पुरूष

स्वराज्यरक्षक, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांची आज पुण्यतिथी आहे. अगदी लहान असल्यापासून त्यांच्यावर अनेक संकटे आली. त्या संकटांवर पाय रोऊन उभे न राहता संभाजी महाराजांनी समर्थपणे झेपही घेतली. अनेक क्षेत्रात आपले निर्विवाद वर्चस्व गाजवले.

---

स्वराज्यरक्षक, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांची आज पुण्यतिथी आहे. छत्रपती संभाजी महाराजांची संपूर्ण कारकीर्द तेजोमय होती. अगदी लहान असल्यापासून त्यांच्यावर अनेक संकटे आली. त्या संकटांवर पाय रोऊन उभे न राहता संभाजी महाराजांनी समर्थपणे झेपही घेतली. छत्रपती शिवाजी महाराजांनंतर स्वराज्याची धुरा सक्षमपणे आपल्या हातात घेऊन संपूर्ण हिंदुस्थानाला तोंडात बोटे घालायला लावणारा प्रचंड पराक्रम संभाजी केला.



छत्रपती शिवाजी महाराजांबरोबर किंवा त्यानंतरही अनेक मोहिमा संभाजी राजेंनी यशस्वीपणे राबवल्या. कोणत्याही मोहिमेत त्यांना कधीच अपयश आले नाही. छत्रपती संभाजी महाराजांना टक्कर देईल, असा योद्धा तत्कालीन हिंदुस्थानात नव्हता.

कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे
रामनगर, गडचिरोली.
9423714883.

संभाजी राजे हे असामान्य व्यक्तिमत्त्व होते. अचाट धैर्य, अजोड पराक्रम, असमान्य शौर्य, प्रयत्नांची पराकाष्ठा, अनेक भाषांवर प्रभुत्व, संस्कृत पंडित, धर्माभिमानी, व्यासंगी, आदर्श महावीर, समाजकारण, राजकारण, अर्थकारण, धर्मकारण अशा अनेक क्षेत्रात निर्विवाद वर्चस्व गाजवले.

संभाजी राजांचा जन्म १४ मे १६५७ रोजी किल्ले पुरंदर येथे झाला. युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराजांना पुत्ररत्न झाले. शिवाजी महाराजांचे संभाजी राजेंवर अपार प्रेम होते. नशीबाचे दशावतार संभाजी महाराजांनी अगदी लहानपणापासूनच भोगले. संभाजी राजे दोन वर्षांचे असताना सईबाईंचे अकाली निधन झाले. त्यानंतर त्यांचा सांभाळ राजमाता जिजाऊंनी केला.

केशवभट आणि उमाजी पंडित यांनी संभाजी राजेंना उत्तम शिक्षण दिले. सुरुवातीच्या काळात त्यांची सावत्र आई सोयराबाई यांनीही त्यांच्यावर खूप माया केली. अनेक ऐतिहासिक नोंदींप्रमाणे संभाजीराजे अत्यंत देखणे आणि शूर होते. लहान असल्यापासूनच संभाजी महाराजांनी राजकारणातील डावपेच, गनिमी कावा आत्मसात केला.

छत्रपती शिवाजी महाराज आग्रा मोहिमेवर गेले असताना त्यांनी संभाजी राजेंनाही सोबत घेतले होते. त्यावेळी संभाजी राजे अवघ्या नऊ वर्षांचे होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या अनेक गोष्टी त्यांनी जवळून पाहिल्या होत्या. शिवाजी महाराज आग्र्याहून सुटल्यानंतर त्यांनी संभाजी महाराजांना मथुरेत ठेवले होते. संभाजी राजेंवर सुरक्षित स्वराज्यात आणण्यासाठी संभाजी राजेंचे निधन झाल्याची अफवा महाराजांनी पसरवून दिली. त्यानंतर २० नोव्हेंबर १६६६ रोजी अगदी सुखरूपपणे ते पुन्हा राजगडास पोहोचले. आग्र्याहून रायगडावर पुन्हा परत येताना संभाजी राजेंनी केलेल्या बुद्धिचातुर्याच्या अनेक कथा प्रसिद्ध आहेत.

**चौदाव्या वर्षी बुधभूषण ग्रंथः** छत्रपती संभाजी महाराजांनी दिलेल्या काही दानपत्रावरून त्यांच्या संस्कृत ज्ञानाविषयी माहिती मिळते. संभाजी राजेंनी वयाच्या अवघ्या चौदाव्या वर्षी बुधभूषण हा ग्रंथ लिहिला. हीच गोष्ट स्वराज्यविरोधक नीच कपटी ब्राह्मणवर्गास सलत होती. बहुजनसमाजातील व्यक्तीने लेखनवाचन करू नये, केल्यास देहदंडाची शिक्षा द्यावी, असा त्यांचा दंडकारण्य होता.

तरीही संभाजींनी तीन भागांतील बुधभूषण या ग्रंथात काव्यालंकार, शास्त्रे, संगीत, पुराणे, धनुर्विद्या यांचा अभ्यास केल्याचा उल्लेख आहे. तसेच राजा आणि त्याचे गुण, राजाचे मदतनीस, राजाचे सल्लगार, राजाची कर्तव्ये, राजसभा, मुख्य प्रधान राजपुत्र, त्यांचे शिक्षण, त्यांची कर्तव्ये, कोश, दुर्ग, सैन्य, हेर, नोकर, वगैरेंची माहिती दिली आहे.

याशिवाय गागाभट्टांकडून नीतिपर 'समयनय' हा ग्रंथ संभाजी राजेंनी लिहून घेतला. 'धर्म कल्पलता' हा धर्मशास्त्रावरील ग्रंथ केशव पंडिताने संभाजीराजांसाठी लिहिला. युद्धकलेतील नैपुण्याबद्दल ॲबे कॅरे या परकीय लेखकाने संभाजी महाराजांची प्रशंसा केली आहे. यावरून संभाजी महाराजांच्या अफाट बुद्धी, ज्ञान, अनेक भाषांवरील प्रभुत्व, धर्माभिमान याचा अंदाज लावता येईल.

**कुशल संघटकः** छत्रपती संभाजी महाराज हे राज्यकारभारातही अत्यंत निपूण होते. ते कुशल संघटक होते. छत्रपती शिवाजी महाराजांप्रमाणे पुढे छत्रपती झाल्यावर संभाजी महाराजांनीही अष्टप्रधान मंडळाची नियुक्ती केली होती.

श्री शंभोः शिवजातस्य मुद्राद्यौरिव राजते
यदं कसेविनी लेखा वर्तते कस्यनोपरि

अशी छत्रपती झाल्यावर संभाजी महाराजांची मुद्रा होती.

**अजिंक्य संभाजी राजेः** छत्रपती संभाजी महाराज यांनी आपल्या पराक्रमाच्याजोरावर अल्प काळात मराठा साम्राज्याच्या विस्तार आणि बचाव केला. मराठा साम्राज्याच्या १५ पट असणाऱ्या मुघल साम्राज्याशी संभाजी महाराजांनी एकहाती लढा दिला. संभाजी महाराजांनी गनिमी कावा पुरेपूर वापरत औरंगजेबाला पुरते जेरीस आणले होते.

संभाजी राजेंनी आपल्या कार्यकाळात एकूण १२० युद्धे लढली. महत्वाचे म्हणजे संभाजी महाराजांना १२० पैकी एकही लढाईत अपयश आले नाही. असा पराक्रम करणारे छत्रपती संभाजी महाराज हे एकमेव योद्धा होते. संभाजी राजांना टक्कर देणारा योद्धा तत्कालीन हिंदुस्थानात नव्हता.

**बुऱ्हाणपूर आणि रामशेजः** छत्रपती शिवरायांनंतर शंभूराजे छत्रपती झाले. संभाजी महाराजांनी सरसेनापती म्हणून हंबीरराव मोहिते यांची नियुक्ती केली. सरनौबत हंबीरराव मोहिते यांनी अचानक बुऱ्हाणपूरवर हल्ला केला. मोठ्या फौजफाट्यासह मराठी सैन्य ७० मैलाची मजल मारून एकाएकी बु?हाणपुरावर चालून गेले. तीन दिवसापर्यंत मराठे लुट करत होते. जडजवाहीर, सोने-नाणे, रत्ने आणि मौल्यवान सामान घेतले. इतर जिन्नसाकडे त्यांनी लक्षही दिले नाही.

भांडीकुंडी, काचेचे सामान, धान्य, मसाले, वापरलेली वस्त्रे आदी सर्व लूट वाहून नेणे शक्य नसल्यामुळे तेथेच टाकून मराठ्यांचे सैन्य निघून गेले. संभाजी महाराजांच्या दराऱ्यामुळे पुढील काही महिने त्या वस्तूला हात लावायची कुणाची हिंमत झाली नाही, अशी आख्यायिका आहे. शहाबुद्दीन फिरोजजंगने रामशेज किल्ल्यावर चाल करून गेला. हा किल्ला सहज हस्तगत करता येईल, अशी मोघलांचा समज होता. मात्र, संभाजी महाराजांनी या किल्ल्यावर रसद पोहोचवण्यासाठी खास तुकडी तैनात केली. मराठ्यांनी कडवी झुंज देत हा किल्ला ५ वर्षे झुंजवत ठेवला होता.

**उदार धार्मिक लोकनितीः** छत्रपती शिवाजी महाराजांचे धार्मिक धोरण संभाजी राजेंनी पुढे चालू ठेवले. अनेक देवस्थाने, मठ, सत्पुरूष यांना वार्षिक नेमणुका पूर्ववत करून दिल्या. संभाजी महाराजांनी संत तुकारामांचा मुलगा महादोबा यास वर्षासन दिले. तसेच मौनी गोसावी, गणीराम, वासुदेव गोसावी, कऱ्हाडचे वेदशास्त्री नरसीभट शेषभट मुंज्येमणी, कांदळगावचे अनंत भट, महादेव भट, महाबळेश्वरचे वेदमूर्ती रामभट, कऱ्हाडचेच शिवभट नीलकंठभट अग्निहोत्री, पावसचे हरिभट पटवर्धन, रामचंद्र केशवभट पंडित, निंब येथील सदानंद मठाचे अनंतगिरी गोसावी यांना सढळ हस्ते मदत केली. त्यांच्या व्यवस्था लावल्या.

संभाजीराजांनी चिंचवड, मोरगाव, सज्जनगड, चाफळ, शिंगणवाडी, महाबळेश्वर इ. देवस्थानांचे व्यवस्थापन योग्य पद्धतीने चालावे, यासाठी पूर्वीची वृत्ती, इनामे व सनदा पूर्ववत केल्या. एकूण धार्मिक कारभाराकडे ते जातीने लक्ष घालत असत, हे तत्कालीन पत्रव्यवहारांतून दिसते.

**हौतात्म्यामुळे अजरामर पराक्रमी पुरूषः** सन १६८९ च्या सुरवातीला छत्रपती संभाजी राजेंचा मेहुणा गणोजी शिर्के आणि औरंगजेबाचा सरदार मुकर्रबखान यांनी संगमेश्वरवर हल्ला केला. मराठ्यांत आणि शत्रूसैन्यात चकमक झाली. मराठ्यांचे संख्याबळ कमी होते. प्रयत्नांची शर्थ करूनही मराठे शत्रूचा हल्ला परतवून लावू शकले नाहीत. परिणामी संभाजी महाराजांना जिवंत पकडण्यात मोघलांना यश आले.

संभाजीराजे आणि कवी कलश यांना औरंगजेबापुढे बहादुरगड येथे नेले. बालविद्येचे ठेकेदार कपटी ब्राह्मणवर्गाने औरंग्याशी हातमिळवणी केली व संभाजींना देह यातना देत मारावे, असा निर्वाणीचा सल्ला त्यास दिला. औरंगजेबाचे अनन्वित अत्याचार छळ जसे कानानाकात तप्त शिसे ओतले, जिभ छाटली, अवयव तोडले व शेवटी शिरच्छेद केला. हे असह्य होऊन सुमारे ४० दिवसांनी २९ मार्च १६८९ रोजी संभाजी महाराजांची प्राणज्योत अखेर मालवली. गुडी पाडव्याच्या दिवशी द्वेषी ब्राह्मणांसहीत मोघलांनी राजांचे मुंडके बांबूत खोचून गावभर उत्साहात मिरवणूक काढली. तेव्हापासून ही परंपरा बांबूवर गढवे उपडे ठेवून गुढी उभारण्यास सुरूवात झाली.

■ ■ ■

# चतुर माणसांची बनवेगिरी सदासर्वकाळ चालू शकत नाही

आर. एस. तायडे
कोणार्क कॉलनी, अमरावती.
९४२०१२५७६१

खरं म्हणजे माणूस हा समाजशिल प्राणी असल्याने तो समाजाच्या समुहाशिवाय एकलकोंडा राहू शकत नाही. ज्याप्रमाणे पाण्याशिवाय मासा बाहेर राहून जगू शकत नाही, अगदी त्याचप्रमाणे माणसांचे सुद्धा आहे, माणूस आपल्या अहंकारी स्वभावानुसार कितीही माणसांपासून दूर राहण्याचा देखावा करीत असला तरी, त्याच्या अंतर्मनात दडलेल्या एकलपणाच्या वेदना त्याचा पिच्छा सोडत नसते.

प्रत्येक माणसाने माणसांच्या समुहात राहून त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होऊन एकमेकांशी सुसंवाद साधून आपले भरकटलेले व अस्थिर असलेले चिंताग्रस्त मन स्थिर करण्याचा प्रयत्न केल्यास आपण आपल्यासह इतरांचे जगणे सुखमय व आनंददायी बनवू शकतो. जशी आपली आनंदी जगण्याची इच्छा आहे तशीच इतरांनाही आनंदी करण्यासाठी प्रत्येकांची मानसिकता तयार होणे अगत्याचे आहे. जेव्हा माणसे माणसांप्रति बंधुभावाचे नाते प्रस्थापित करतील तेव्हा समाजातून साऱ्या अनिष्ट रूढी, जुनाट परंपरा, जातीभेद, तिरस्कार, मतभेद, मनभेद नक्कीच हद्दपार होतील. त्यामुळे साहजिकच समाजस्वास्थ्य सुदृढ तर बनेलच शिवाय गाव, शहर, राज्य आणि देशाच्या विकासाला सुद्धा आपला हातभार लागत असल्याचे समाधान पदरात पाडून घेता येईल.

तसे न करता माणसेच माणसांच्या आयुष्यात विविध कारणांतून गतीरोधक बनून पुढे येत असतील तर, माणसांच्या माणूसकीला काय अर्थ उरेल याचा विचार करण्याची जबाबदारी एकाची नसून ती सर्व समाज घटकांची असते.माणसाने केवळ इतरांना शहाणपणाचा उपदेश करतांना आपलेही आत्मचिंतन करण्याची आवश्यकता आहे.

समाजात वावरत असतांना अनुभवाअंती असेही कळून चुकले की, काहीजण केवळ माणसांनाच आपल्या चतुराईने बनवून आपला चरितार्थ चालवित असतात.पोट भरण्याची त्यांची कुवत असतांना फुकटची भिक मागण्याची प्रवृत्ती ही शेवटी आपल्यासाठी आणि समुहासाठी सुद्धा लाचार बनवणारी असते याचे भान जीवन जगत असतांना प्रत्येकाने ठेवण्याची गरज आहे. कारण बनवेगिरीचे आयुष्य काही काळ मानसिक समाधान देणारे असलेतरी, बनवेगिरीच्या माध्यमातून ज्यांचे आर्थिक, मानसिक शोषण करण्यात आले त्यातील काहींचे आयुष्य उद्ध्वस्त झालेले असते.

त्यासाठी आपण पुर्वी कसे होतो, कोणत्या परीस्थितीत वावरत होतो आणि आता काय करीत आहोत याचे भान हरेक नागरिकांनी आपल्या डोळ्यासमोर ठेवून पुढे मार्गक्रमण करण्याची गरज आहे. आपण काय करतो आणि काय केले पाहिजे याचे शांत चित्ताने आत्मचिंतन केल्यास निश्चितच त्यातून सुयोग्य मार्ग गवसतो.

इतरांना दुःखं देण्यापेक्षा त्यांना सुखी करण्यात खरं सुख आहे, याची जाणीव न ठेवता माणूस भौतिक सुखाच्या मागे धावतो आहे, पैसा कमावण्याच्या नादात तो माणूसकी विसरत चालला आहे, पैशासाठी काहीपण करण्यासाठी तो तयार असतो आणि हिच त्याची लालची प्रवृत्ती अनेकदा माणूसकीला काळीमा फासणारी ठरते आहे. म्हणूनच काही माणसे काही माणसांना काही काळ मुर्ख बनवू शकतात, मात्र ते सदासर्वकाळ सर्वांना मुर्ख बनवू शकत नाहीत. याची माणसांनी माणसांसाठी जाणीव ठेवणे आवश्यक आहे.

शेवटी माणसाने पैसा पैसा न करता आनंददायी व सुखमय जीवनप्रवास व्हावा अशी त्यांची मनोमन इच्छा असल्यास, त्यांनी "सुजल्याफुगल्यामुळे आलेल्या लठ्ठपणापेक्षा शरीराने पातळ असनेच फार उत्तम आणि जगात अन्यायाने मिळविलेल्या धनापेक्षा निर्धन राहणेच फार उत्तम"या सुविचारावरून योग्य तो बोध घेतल्यास आपले जीवन नक्कीच सार्थकी लागेल यात शंका नाही. त्यासाठी वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात की, "अपने आतमके चिंतनमे हरदम जागृत रहना है"शेवटी जीवन जगतांना रडत रडत जगावे की, हसत खेळत जगावे, याचा विचार करण्याचे स्वातंत्र्य प्रत्येकाला आहे.

■ ■ ■

# एप्रिल फुल

श्याम ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

आज १ एप्रिल आजचा दिवस संपूर्ण दिवस जगात एप्रिल फुल म्हणून साजरा केला जातो. फुल ( fool ) म्हणजे मूर्ख. या दिवशी लोक एकमेकांना मूर्ख बनवतात. आपणही या दिवशी कोणाला तरी मूर्ख बनवलेच असेल.

दुसऱ्याला मूर्ख बनवून एप्रिल फुल करण्याचा आनंद यापण सगळ्यांनीच लुटला असेल. एप्रिल फुल या प्रथेची सुरवात कधी झाली हे निश्चितपणे सांगता येणार नाही. याबाबत अनेक कथा प्रचलित आहे

त्यातल्या एका फ्रेंच कथेनुसार पंधराव्या शतकात फ्रान्समध्ये ज्युलियन कॅलेंडर वापरत होते त्या कॅलेंडरप्रमाणे नववर्षाची सुरवात २५ मार्च ते १ एप्रिल या आठवड्यात होत असे. या आठवड्यात सगळे लोक वसंत ऋतूचे स्वागत आणि १ एप्रिलला नववर्ष साजरे करीत असत. मात्र १५८२ सालापासून फ्रेंच लोकांनी ग्रेगरियन कॅलेंडर स्वीकारले. या कॅलेंडर नुसार १ जानेवारीपासून पासून नववषार्चा प्रारंभ होतो. हा बदल तेथील ग्रामीण भागातील अशिक्षित लोकांना माहीत नव्हता ते १ एप्रिलाच नववर्ष साजरा करीत त्यामुळे या लोकांना तेथील उच्चभ्रू , सुशिक्षित लोक मूर्ख ( fool ) म्हणत. जे लोक १ एप्रिलला नववर्ष साजरा करीत त्यांना फ्रांसमध्ये एप्रिल फुल असे संबोधले जाई. अशा तऱ्हेने १ एप्रिलला एप्रिल फुल करण्याची प्रथा जगभर पसरली.

फ्रेंच लोक भारतात आल्यानंतर भारतातही ही प्रथा सुरू झाली. १ एप्रिलला आपले मित्र, नातेवाईक यांना एप्रिल फुल करण्याची प्रथा आता चांगलीच रुजली आहे. काळानुसार बदल होत आता लोक फेसबुक, व्हाट्सएप, ट्विटर या सोशल मीडियांच्या माध्यमातून एकमेकांना एप्रिल फुल करीत आहेत. आपल्या मित्रांना, नातेवाईकांना एप्रिल फुल करून त्यातून मिळणारा आनंद हा क्षणिक असला तरी तो आजच्या धकाधकीच्या जीवनात मोलाचा आहे.

दुसऱ्यांना एप्रिल फुल बनवताना प्रत्येकाने स्वतःमधील वाईट प्रवृत्तीलाही एप्रिल फुल बनवावे. दररोज उशिरा उठण्याच्या सवयीला लवकर उठून व्यायाम करून एप्रिल फुल करावे. दररोज मोबाईल वापराच्या सवयीला एप्रिल फुल करून एखादे छानसे पुस्तक वाचावे. सर्वांशी जिव्हाळ्याने वागून आपल्यातील अहंकाराला एप्रिल फुल करावे. गरजवंताला मदत करून स्वाथार्ला एप्रिलफुल करावे. मोठेपणाला एप्रिलफुल करून लहान मुलांशी खेळावे. स्वतःच्या मी पणाला एप्रिलफुल करुन आम्ही बनून समाजात वावरल्यास एकमेकांविषयी असलेली कटुता कमी होईल आणि प्रत्येकाला जीवनाचा आनंद घेता येईल.

■ ■ ■

# प्रियदर्शी सम्राट अशोक

वाचक लिहितात

भारताच्या इतिहासात अनेक सम्राट झाले, पण त्यातील सर्वांत महान आणि लोककल्याणकारी सम्राट म्हणजे सम्राट अशोक. त्यांना प्रियदर्शी म्हणजेच प्रजेची काळजी घेणारा सम्राट असे संबोधले जात असे. अशोक हे केवळ पराक्रमी राजा नव्हते, तर त्यांनी शांती, अहिंसा आणि धमार्चा प्रचार केला.

मौर्य साम्राज्याची स्थापना चंद्रगुप्त मौर्य यांनी केली. यापूर्वी भारतात नंद वंशाचे राज्य होते. त्यांचा शेवटचा राजा धनानंद याचा पराभव करून चंद्रगुप्त मौर्याने मौर्य साम्राज्याची स्थापना केली. त्यांची राजधानी पाटलीपुत्र (आजचे पाटणा, बिहार) येथे होती. चंद्रगुप्त मौर्यानंतर त्यांचा पुत्र बिंदुसार गादीवर आला. त्याने राज्याचा विस्तार केला आणि प्रजेसाठी चांगले निर्णय घेतले. बिंदुसार यांचा पुत्र अशोक उज्जयिनी येथे राज्यपाल होता. त्याने उत्तम प्रशासन सांभाळले आणि पुढे गादीवर आला. सम्राट अशोकांनी अनेक विजय मिळवले, पण त्यांचे कलिंग युद्ध (आजचे ओडिशा राज्य) हे त्यांच्या जीवनातील महत्त्वाचा टप्पा ठरले. युद्धात हजारो सैनिक मारले गेले, आणि संपूर्ण युद्धभूमी रक्ताने माखली. हा भयंकर नरसंहार पाहून सम्राट अशोकांना खूप दुःख झाले.

या घटनेनंतर त्यांनी युद्ध न करण्याचा आणि अहिंसेचा मार्ग स्वीकारण्याचा निर्णय घेतला. त्यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला आणि शांती, प्रेम आणि करुणेचा प्रसार करण्यास सुरुवात केली. त्यांनी आपल्या पुत्र महेंद्र आणि कन्या संघमित्रा यांना श्रीलंकेत बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी पाठवले.

सम्राट अशोकांनी आपल्या प्रजेच्या भल्यासाठी अनेक सुधारणा केल्या. त्यांनी रुग्णालये, धरणे, विहिरी, शाळा आणि धर्मशाळा बांधल्या. त्यांचा कारभार लोकाभिमुख होता. त्यांनी अत्याचार, अन्याय आणि भेदभावाला विरोध केला.

त्यांनी बौद्ध धर्माच्या तिसऱ्या परिषदेस पाटलीपुत्र येथे आयोजन केले. त्यांनी स्तूप आणि स्तंभ उभारून बौद्ध धमार्चा प्रसार केला. त्यातील काही महत्त्वाचे स्तूप आणि स्तंभ :

सांचीचा स्तूप (मध्य प्रदेश) जगप्रसिद्ध बौद्ध स्तूप

अशोक स्तंभ (सारनाथ) : भारताच्या राष्ट्रीय प्रतीकाचा भाग

लोहस्तंभ (दिल्ली) : हजारो वर्षे गंज न लागलेला स्तंभ

वैशाली स्तंभ (बिहार) : बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी उभारलेला स्तंभ

सम्राट अशोक हे भारतातील सर्वांत महान आणि लोककल्याणकारी सम्राट होते. त्यांनी अहिंसा, प्रेम आणि न्याय यांचे मूल्य प्रस्थापित केले. त्यांच्या कायार्मुळे भारताच्या इतिहासात त्यांचे नाव सुवर्णाक्षरांनी कोरले गेले आहे. त्यांचा आदर्श आजही संपूर्ण जगासाठी प्रेरणादायी आहे.

-------

■ क्षितिज कोल्हे
जि. प. प्राथमिक शाळा सुकळी,
केंद्र कोठा, ता. कळंब,
जि. यवतमाळ.

# मोड आलेले कडधान्य खाताना लक्षात ठेवा या गोष्टी...



तंदुरुस्त राहण्यासाठी काहीजण त्यांच्या आहारात मोड आलेले कडधान्य समाविष्ट करतात. तसेच आरोग्य तज्ज्ञांच्या मते मोड आलेले कडधान्य हे पौष्टिकतेचे एक पावर हाऊस आहे. यांच्या सेवनाने आपल्या आरोग्याला अनेक फायदे होतात.

मात्र हे मोड आलेले कडधान्य खाण्याची योग्य पद्धत माहित नसल्याने अनेकांना याच्या सेवनाचे फायदे मिळतच नाहीत. मोड आलेले कडधान्य खाण्याची योग्य पद्धत कोणती? यामध्ये कोणते पोषक घटक असतात? आणि हे खाण्याचे काय फायदे आहेत?

आहारतज्ज्ञांच्या मते मोड आलेल्या कडधान्यांमध्ये अनेक प्रकारचे जीवनसत्त्वे, खनिजे आणि अँटीऑक्सिडंट्स असतात, जे एकूण आरोग्यासाठी आवश्यक मानले जातात. त्यात जीवनसत्त्वे अ, ब, क आणि ई सारख्या पोषक तत्वांचा समावेश आहे, तर त्यात कॅल्शियम, लोह आणि मॅग्नेशियम देखील मोठ्या प्रमाणात असते. जे वजन कमी करण्यास उपयुक्त ठरते.

मोड आलेले कडधान्यांमधील पोषक घटक केवळ शरीराला बळकटी देत नाहीत तर विविध अवयवांच्या कार्यातही योगदान देतात. तसेच तुमची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होते. त्याचबरोबर याच्या सेवनाने तुमच्या शरीरातील कोलेस्टेरॉल देखील नियंत्रित करतात आणि डोळे निरोगी ठेवण्यास मदत करतात.

याशिवाय वजन कमी करण्यासाठी तुमच्या आहारात मोड आलेले कडधान्यांचा समावेश करा. या कडधान्यांचे सेवन करून पोट आणि केसांशी संबंधित समस्या देखील दूर करू शकतात.

प्रत्येकाची मोड आलेले कडधान्य खाण्याची स्वतःची पद्धत असते. तथापि बहुतेक लोकांना ते कच्चे खायला आवडतात. परंतु तुम्हाला माहिती आहे का की ही पद्धत पूर्णपणे चुकीची आहे.

अलिकडच्या संशोधनात असे आढळून आले आहे की कच्चे मोड आलेले कडधान्य खाणे हे एक धोकादायक आहे. कारण कच्चे मोड आलेले कडधान्य खाल्ल्याने आपल्याला अनेक आजार होण्याची शक्यता असते, म्हणून हे मोड आलेले कडधान्य कच्चेच खाण्याऐवजी शिजवून खावे, असे अनेक आहारतज्ज्ञ सांगत आहेत.

■ ■ ■

## अशोकायन



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

### एप्रील फूल ' चा संदेश

ज्यांच्यावर असतो
आपला विश्वास भारी
तेच देती आपणास
धोका कधी तरी ..!

याची आठवण देण्या
एप्रील फूल ची प्रथा
सुरु केली कुणीतरी
असे वाटते भौ अंतरी .. !

अती विश्वासच स्वार्थापोटी
करीत असतो घात
म्हणूनच ताक ही फुंकून
प्यावे म्हणण्याचा
पडला प्रघात . .

# दत्ता मेघे मेडिकल कॉलेजमध्ये आयोजित डवान्स नि अँड शोल्डर आर्थ्रोस्कोपी कार्यशाळेमुळे शल्यचिकित्सक नव्या तंत्रज्ञानाने सज्ज

## स्मिथ अँड नेफ्यू आणि दत्ता मेघे मेडिकल कॉलेजतर्फे अत्याधुनिक कॅडॅव्हेरिक कार्यशाळेचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर,दि. ३१ मार्च :



दत्ता मेघे इंस्टिट्यूट ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्च सेंटर (डीयू) अर्थात एसएमएचआरसीचा अविभाज्य भाग असलेले दत्ता मेघे मेडिकल कॉलेज (डीएमएमसी) हे वैद्यकीय शिक्षणाच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण कामगिरी करत असून नवा मापदंड प्रस्थापित करत आहे. महाविद्यालयात अंडरग्रॅज्युएट आणि पोस्टग्रॅज्युएट वैद्यकीय अभ्यासक्रमांसोबतच आधुनिक सिम्युलेशन लॅब, सुसज्ज सेंट्रल म्युझियम आणि प्रगत कॅडॅव्हेर(शवविज्ञान) सर्जिकल स्किल्स वर्कशॉप उपलब्ध आहे. या सुविधा वैद्यकीय प्रशिक्षण वाढवण्यास मदत करतात तसेच विविध वैद्यकीय आणि आरोग्यसंस्था यांच्यासाठी कार्यशाळा, सहकार्य आणि एकत्रित संशोधनासाठी महत्त्वाचा स्रोत ठरतात.

नुकतेच नागपूरच्या वानाडोंगरी स्थित दत्ता मेघे मेडिकल कॉलेज येथे एका डवान्स नि अँड शोल्डर कॅडॅव्हेरिक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या दोन दिवस दिवसीय कार्यशाळेत विशेष कौशल्याची आवश्यकता असलेल्या अत्याधुनिक आणि गुंतागुंतीच्या आर्थ्रोस्कोपीक प्रक्रियांबाबत प्रशिक्षण देण्यात आले. भारतभरातून आलेल्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांनी भारतातील विविध राज्यातून आलेल्या प्रतिनिधींना या कार्यशाळेत प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले.

ऑर्थोपेडिक आणि स्पोर्ट्स मेडिसिन सोल्यूशन्समध्ये तज्ञ असलेल्या यूएसए-आधारित जागतिक वैद्यकीय तंत्रज्ञान कंपनी असलेल्या स्मिथ अँड नेफ्यू यांच्या सहकार्याने ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. डीएमएमसीच्या कॅडॅव्हेरिक स्किल लॅबमुळे हा कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न झाला. डीएमएमसी ची उत्कृष्ट पायाभूत सुविधा, समर्पित व्यवस्थापन, आणि कार्यक्षम टीम पाहून स्मिथ अँड नेफ्यू ने ही जागा कार्यशाळेसाठी निवडली. ही कार्यशाळा मध्य भारतातील पहिली अशा प्रकारची कार्यशाळा होती, ज्यामुळे देशभरातील तज्ज्ञ आणि नवोदित डॉक्टरांना आपल्या शस्त्रक्रिया कौशल्यांना नवा आयाम देण्याची संधी मिळाली.

या प्रशिक्षणासाठी आठ तज्ज्ञ डॉक्टरांच्या चमूने मार्गदर्शन केले. यात डॉ. सिद्धार्थ जैन, डॉ. मुकेश लड्डा, डॉ. आदित्य पावसकर, डॉ. सागर काकतकर, डॉ. डी.एस. भामरे, डॉ. प्रविण तित्तल, डॉ. सी.आर. सुरेश बाबू, आणि डॉ. अर्पित दवे यांचा समावेश होता. या तज्ज्ञांनी त्यांच्या प्रचंड अनुभवातून क्लिष्ट अशा अत्याधुनिक आर्थ्रोस्कोपी तंत्रज्ञानासंबंधी मौल्यवान मार्गदर्शन दिले. दत्ता मेघे इंस्टिट्यूट ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्च सेंटर (डीयू) चे संचालक डॉ. अनुप मरार यांनी सांगितले की, या कार्यशाळेत एकूण २८ प्रतिनिधींनी आर्थ्रोस्कोपी शस्त्रक्रियेतील प्रगत तंत्रे शिकण्यास उत्साहाने सहभाग घेतला. ऑर्थोपेडिक्स विभागाचे तज्ज्ञ, डॉ. सिद्धार्थ जैन आणि डॉ. वसंत गावंडे यांच्या मार्गदर्शनाखाली ऑर्थोपेडिक्स विभागातील प्राध्यापकांनी राष्ट्रीय स्तरावरील तज्ज्ञांना आणि सहभागी झालेल्या प्रतिनिधींना संस्थेमध्ये उपलब्ध असलेल्या उत्तम सुविधांची ओळख करून दिली.

या कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेच्या समर्पित टीमने विशेष मेहनत घेतली. या टीममध्ये डॉ. वसंत गावंडे, डॉ. कुणाल सावजी, डॉ. तेजस आपटे, डॉ. अजय नेनवानी, डॉ. अंजली बोरकर, डॉ. तृप्ती बलवीर आणि इलेक्ट्रॉनिक डाटा प्रक्रिया विभागातील विवेक यांचा समावेश होता. डॉ. ब्रिज सिंग, एसव्हीएल टीम, शरीरशास्त्र विभाग आणि डीएमएमसी व एसएमएचआरसीच्या सर्व सदस्यांचे कार्यशाळेच्या यशासाठी मोलाचे योगदान राहिले. कार्यक्रमाचे समन्वयन अलिया शफी यांनी केले.

डीएमसीसीचे अधिष्ठाता डॉ. उज्ज्वल गजबे यांनी सांगितले की, या उपक्रमामुळे दत्ता मेघे वैद्यकीय महाविद्यालयाची वैद्यकीय शिक्षण आणि प्रशिक्षण प्रगत करण्याच्या वचनबद्धतेला बळकटी मिळाली. ऑर्थोपेडिक्स क्षेत्रातील तज्ज्ञांना आपल्या सर्जिकल कौशल्यांचा विकास करण्यासाठी एक व्यासपीठ मिळाल्यामुळे आर्थ्रोस्कोपी प्रक्रियांमध्ये अधिक सुधारणा घडवण्यास मदत झाली. या कार्यशाळेच्या यशामुळे भविष्यातील प्रशिक्षण कार्यक्रमांसाठी नवा आदर्श निर्माण झाला असून, उत्कृष्ट वैद्यकीय शिक्षणासाठी महत्त्वाचे केंद्र म्हणून संस्थेची प्रतिष्ठा अधिक दृढ होत आहे.

# कशाप्रकारे प्रतीक्षा राय करिष्माला जीवंत करत आहे वसुधामध्ये!

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई,दि. ३१ मार्च :



झी टीव्हीवरील वसुधा ह्या मालिकेने प्रेक्षकांना आपल्या नाजूक आणि रोचक कथेसह आपल्या खुर्च्यांना खिळवून ठेवले आहे. वसुधा प्रिया ठाकूर आपल्या ह्या श्रद्धेवर विश्वास ठेवून राहते की देवांश अभिषेक शर्मा ने दिलेले मंगळसूत्र जर तिने परिधान करून ठेवले तर त्याच्या जीवाचे संरक्षण होईल, तेव्हा करिष्मा प्रतीक्षा राय तिच्यासोबत कट करण्याची संधी मिळवते. आपल्या व्यक्तिरेखा अचूक बनवण्यासाठी कलाकारांना अथक सराव करावा लागतो आणि अशीच एक समर्पित अभिनेत्री आहे प्रतीक्षा राय जी कटकारस्थानी आणि आकर्षक अशा करिष्माची भूमिका साकारत असून आपल्या बारकाईच्या परफॉर्मन्ससह वलये निर्माण करत आहे. तिची व्यक्तिरेखा वसुधासाठी अडथळे निर्माण करत असून इस्पितळात देवांश अभिषेक शर्मा ला इजा पोहोचवण्याच्या करिष्माच्या प्रयत्नाचे अगदी उत्तम चित्रण प्रतीक्षाने केले आहे.

वरकरणी निरागसपणाचा आव आणत करिष्मा लपूनछपून कारवाया करते, अफवा पसरवते आणि अस्थिरपणाचा फायदा उठवते आणि अर्थातच त्यामुळे प्रेक्षकांची उत्सुकता ताणली जाते. आपली भूमिका अचूक बनवण्यासाठी प्रतीक्षाने आपल्या आवाजाच्या मॉड्युलेशन आणि संवादफेकीवर सक्रियपणे कार्य केले असून मालिकेच्या दिग्दर्शकांकडून मौल्यवान सल्ला घेत आपल्या सहकलाकारांचेही ऐकले आहे. आपल्या अभिनयामध्ये सखोलपणा आणत तिने बॉलीवूडमधील सर्वांत आयकॉनिक खलनायिका ऐतराजमधील प्रियांका चोप्राच्या शक्तीशाली व्यक्तिरेखेकडून प्रेरणा घेतली आहे.

आपल्या व्यक्तिरेखेबद्दल प्रतीक्षा राय म्हणाली, करिष्माच्या व्यक्तिरेखेल्या अनेक स्तर असून तिच्या कृतीमागे तिचे खासगी हेतू असून ती कधीही दुसऱ्यांच्या भावनेबद्दल विचार करत नाही. तिला साकारणे आव्हानात्मक आहे कारण ती आतून कटकारस्थानी असली तरी बाहेरून मात्र अतिशय आकर्षक आहे. आपल्या भूमिकेसाठी तयारी करण्यासाठी मी माझ्या आवाजाच्या मॉड्युलेशन आणि संवादफेकीवर सक्रियपणे कार्य केले असून ऐतराजमधील प्रियांका चोप्राच्या खलनायकी व्यक्तिरेखेकडून प्रेरणा घेतली आहे. वसुधाच्या सेटवरील माझ्या सहकलाकारांनी मला जे मार्गदर्शन केले त्याबद्दल मी आभारी आहे. ऑनस्क्रीन माझ्या व्यक्तिरेखेच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देण्यामध्ये यामुळे मोठी मदत झाली आहे. तिच्या मानसिकतेमध्ये डोकावून पाहण्याचा अनुभव उत्तम शिकवण होती.

# एचआयएल (HIL) लिमिटेड आता झाले बिर्लानु (BirlaNu) लिमिटेड

■ महासागर प्रतिनिधी
दिल्ली,दि. ३१ मार्च :

३ अब्ज अमेरिकन डॉलर्सच्या सीके बिर्ला ग्रुपचा भाग असलेल्या एचआयएल लिमिटेडने स्वत:चे नाव बिर्लानु (BirlaNu) लिमिटेड असे बदलण्याची घोषणा केली. हे कंपनीच्या महत्त्वाकांक्षी वाढीच्या धोरणाचे आणि बांधकाम उत्पादन क्षेत्रात जागतिक दर्जाची उत्पादने आणि सेवा देण्याच्या तिच्या वचनबद्धतेचे प्रतिबिंब आहे. कंपनीच्या भारत आणि युरोपमध्ये ३२ उत्पादन सुविधा आहेत, ज्यांचे ग्राहक आणि भागीदार ८० हून अधिक देशांमध्ये आहेत.

बिर्लानुच्या अध्यक्षा अवंती बिर्ला म्हणाल्या, आमची नवीन ओळख, बिर्लानु, आमच्या केंद्रस्थानी आम्ही कोण आहोत हे प्रतिबिंबित करतेएक अशी कंपनी जी नेहमीच पुढे जात असते. आम्ही या व्यवसायात आहोत कारण आम्ही गुणवत्ता, नावीन्य आणि टिकाऊ गोष्टी बनवण्यावर विश्वास ठेवतो. आम्ही ज्या लोकांना सेवा देतो -घरमालक, बांधकाम व्यावसायिक आणि डिझायनर -हे आम्ही करत असलेल्या प्रत्येक गोष्टीचे केंद्रबिंदू असतात. चांगले साहित्य तयार करणे असो, शाश्वतता सुधारणे असो किंवा बांधकामात नवीन कल्पना आणणे असो, आम्ही येथे काळाच्या कसोटीवर टिकणाऱ्या नाविन्यपूर्ण इमारती आणि संरचना तयार करत आहोत.

बिर्लानू चे व्यवस्थापकीय संचालक आणि सीईओ अक्षत सेठ म्हणाले, आमचे लक्ष नेहमीच उच्च दर्जाचे, शाश्वत बांधकाम साहित्य: पाईप्स, बांधकाम रसायने, पुट्टी, छप्पर, भिंती आणि फरशी यांच्यासारख्या वस्तू पुरवण्यावर राहिले आहे जे आधुनिक बांधकामाच्या गरजा पूर्ण करतात. याला पाठिंबा देण्यासाठी आम्ही मोठे पाऊल उचलत आहोत. आम्ही देशात प्रथमच एखाद्या उद्योगाने जड धातू ऐवजी युपीवीसी पाईप उत्पादनात ऑरगॅनिक बेस्ड स्टॅबिलायझर्स (ओबीएस) सादर केले आहे. आम्ही चेन्नईमध्ये आमची एएसी ब्लॉक क्षमता दरवर्षी ४ लाख घनमीटरपर्यंत दुप्पट केली आहे, ज्यामुळे ती देशातील सर्वात मोठ्या सुविधांपैकी एक बनली आहे. आणि घर आणि अंतर्गत जागेत आमचा विस्तार चिन्हांकित करत, आमचा जागतिक प्रीमियम फ्लोअरिंग ब्रँड पॅराडोर भारतात आणण्याचा मानस आहे.

प्रामाणिकपणा, सहकार्य आणि उत्कृष्टतेचा गाभा असलेल्या बिर्लानु उद्योगातील बेंचमार्क पुन्हा परिभाषित करण्यासाठी आणि अर्थपूर्ण प्रभाव पाडण्यासाठी सज्ज आहे. बिर्लानु हे केवळ एक नाव नाही – ते भविष्यातील उद्देशाच्या उभारणीत एक विश्वासार्ह भागीदार होण्यासाठी एक नवीन उद्देश आणि वचनबद्धतेचे प्रतिनिधित्व करते. जग विकसित होत असताना, बिर्लानु जीवन उलगडणाऱ्या जागांना आकार देण्यासाठी आणि सुंदर, चिरस्थायी डिझाइनला प्रेरणा देण्यासाठी वचनबद्ध आहे.

# स्टड्स ॲक्सेसरीज लिमिटेड तर्फे सेबीकडे डीआरएचपी सादर

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई,दि. ३१ मार्च :

स्टड्स ॲक्सेसरीज लिमिटेड (द कंपनी)ही भारतातील आर्थिक वर्ष २०२३ मधील महसुलाच्या दृष्टीने सर्वात मोठी दुचाकीसाठी हेल्मेट उत्पादक कंपनी आणि कॅलेंडर वर्ष २०२४ मध्ये एकूण प्रमाणाच्या दृष्टीने जगातील सर्वात मोठी दुचाकीसाठीची हेल्मेट उत्पादक कंपनी आहे. (स्रोत: केयर अहवाल). कंपनीने सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी) कडे आपला ड्राफ्ट रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस (डीआरएचपी) सादर केला आहे.

कंपनी प्राथमिक समभाग विक्रीद्वारे इक्विटी शेअर भांडवलाच्या ऑफरच्या माध्यमातून निधी उभारण्याची योजना आखत आहे. सार्वजनिक ऑफरमध्ये प्रति शेअर ५ रु. दर्शनी मूल्य असलेल्या ७,७८६,१२० पर्यंतच्या इक्विटी शेअर्सच्या ऑफर फॉर सेलचा समावेश आहे.

स्टड्स ॲक्सेसरीज 'Studds' आणि 'SMK' ब्रँडअंतर्गत दुचाकी चालवताना घालायच्या हेल्मेट्सची डिझाइन, निर्मिती, विपणन आणि विक्री करते. तसेच 'Studds' ब्रँडअंतर्गत दोन चाकी सामान, हातमोजे, हेल्मेट लॉकिंग डिव्हाइस, रेनसूट, रायडिंग जॅकेट आणि आयवेअर यासारख्या इतर ॲक्सेसरीजची विक्री करते. कंपनीच्या उत्पादनांची विक्री संपूर्ण भारतात आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर ७० हून अधिक देशांमध्ये केली जाते. अमेरिका, आशिया (भारत वगळता), युरोप आणि उर्वरित जग या प्रमुख निर्यात बाजारपेठा आहेत. 'Studds' कंपनी Jay Squared LLC साठीही हेल्मेट्सचे उत्पादन करते. ती 'Daytona' ब्रँड अंतर्गत युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका मध्ये विकली जातात तसेच O'Neal साठी त्यांच्या ब्रँडिंग अंतर्गत हेल्मेट्स तयार करून युरोप, युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका आणि ऑस्ट्रेलियामध्ये पुरवठा केला जातो.

आयआयएफएल कॅपिटल सरव्हिसेस लिमिटेड आणि आयसीआयसीआय सिक्युरिटीज लिमिटेड हे या इश्यूसाठी बुक रनिंग लीड मॅनेजर्स (BRLMs) आहेत.

# आसिफ शेख, झारा वारसी आणि सलिम झैदी यांनी त्यांच्या ईद साजरीकरणाबाबत सांगितले!

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई,दि. ३१ मार्च :



ईद आनंद, एकता व कृतज्ञता व्यक्त करण्याचा सण आहे. एण्ड टीव्ही कलाकार देखील त्यांच्या प्रियजनांसोबत हा सण साजरा करण्यास उत्सुक आहेत. फेस्टिव्ह मिष्टान्नांचा आस्वाद घेण्यापासून दान करण्याचा उत्साह जपण्यापर्यंत प्रत्येकाची ईद साजरीकरणाला संस्मरणीय करण्याची विशेष पद्धत आहे. काहीजण त्यांच्या मूळगावामध्ये सण साजरा करण्यासह बालपणीच्या परंपरांना उजाळा देतील, तर काहीजण कुटुंब व मित्रांसोबत संस्मरणीय संमलेनाचे नियोजन करत आहेत. हे कलाकार आहेत आसिफ शेख (विभुती नारायण मिश्रा, भाबीजी घर पर है'), झारा वारसी (चमची, हप्पू की उलटन पलटन) आणि सलिम झैदी (टिल्लू, भाबीजी घर पर है'). मालिका भाबीजी घर पर है'मधील आसिफ शेख ऊर्फ विभुती नारायण मिश्रा म्हणाले, ईद सण प्रेम, आनंद व कौटुंबिक एकत्रिकरणासह नेहमी माझ्या मनाच्या जवळ राहिला आहे. पण, यंदा माझ्या तब्येतीमुळे काहीशी आव्हाने आहेत. नुकतेच मला सेटवर सायटियाच्या गंभीर वेदना जाणवल्या होत्या, ज्यामुळे स्थिती काहीशी अवघड झाली आहे. पण, मी माझा उत्सवी उत्साह कमी होऊ देणार नाही. मी काळजी घेण्यासह माझ्या प्रियजनांसोबत सण साजरा करण्यास उत्सुक आहे. कुटुंबाचा सहवास, सणासाठी आकर्षक पोशाख पेहराव करणे आणि ईदच्या मिष्टान्नांचा आस्वाद घेणे याचा मी भरपूर आनंद घेतो. मी फारशी हालचाल करू शकत नसलो तरी ईद कृतज्ञता व एकतेचा सण आहे आणि हीच गोष्ट महत्त्वाची आहे. मी माझ्या चाहत्यांकडून मिळणारे प्रेम व आत्मीयतेचे कौतुक करतो आणि सर्वांना आनंद, आरोग्य व समृद्धतेने भरलेल्या ईदच्या शुभेच्छा देतो.''

तुमच्या आवडत्या कलाकारांना पाहण्यासाठी पाहत राहा मालिका हप्पू की उलटन पलटन' रात्री १० वाजता आणि भाबीजी घर पर है' रात्री १०.३० वाजता दर सोमवार ते शुक्रवार फक्त एण्ड टीव्हीवर!

# अभिनेत्रींनी उन्हाळ्यामध्ये त्यांच्या मेकअपसाठी आवश्यक असलेल्या उत्पादनांबाबत सांगितल

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई,दि. ३१ मार्च :

उन्हाळा विशेषत: कडाक्याच्या ऊनामध्ये व उच्च तापमानामध्ये बाहेर शूटिंग करताना घातक ठरू शकतो. घाम, आर्द्रता आणि दीर्घकाळपर्यंत शूटिंगमुळे मेकअप कायम ठेवणे आव्हानात्मक ठरू शकते. एण्ड टीव्हीवरील अभिनेत्री स्मिता साबळे (धनिया, 'भीमा'), गीतांजली मिश्रा (राजेश, 'हप्पू की उलटन पलटन' आणि शुभांगी अत्रे (अंगूरी भाबी, 'भाबीजी घर पर है') उन्हाळ्यामध्ये मेकअपचे संरक्षण करण्याच्या टिप्सबाबत सांगत आहेत, ज्यामुळे त्यांना दिवसभर फ्रेश व कॅमेऱ्यासमोर उत्साहीपणे सुसज्ज राहण्यास मदत होते. मालिका 'भीमा'मध्ये धनियाची भूमिका साकारणाऱ्या स्मिता साबळे म्हणाल्या, ''माझी भूमिका धनियासाठी मेकअप अत्यंत नैसर्गिक व साधा आहे, ज्यामध्ये अर्थी टोन्स आणि कोमल, नो-मेकअप लुक आहे, जे तिच्या समकालीन व विनम्र व्यक्तिमत्त्वाला साजेसे आहे. मेकअपसंदर्भात अतिरेक करण्यापेक्षा नैसर्गिक सौंदर्य वाढवण्यावर अधिक भर दिला जातो, ज्याची मी प्रशंसा करते. पण उन्हाळ्यादरम्यान कडाक्याच्या ऊनामध्ये शूटिंग करण्यासाठी उत्तम स्किनकेअरची गरज असते. मी नेहमी वजनाने हलके, ऑइल-फ्रीमॉइश्चराइजर व मॅटिफाइंग प्राइमरचा वापर करते, ज्यामधून कोमल व नॉन-ग्रीसीलुक प्राप्त करते. मी अधिक प्रमाणात फाऊंडेशनऐवजी टिंटेड मॉइश्चराइजर किंवा बीबी क्रीमचा वापर करते, जे चेहऱ्यावर मुरमं न आणता नैसर्गिक फिनिश देते. मी प्रत्येकवेळी आकर्षक दिसण्यासाठी सेटिंग स्प्रेचा देखील वापर करते, ज्यामधून दीर्घकाळपर्यंत बाहेर शूटिंग करताना देखील माझा लुक सर्वोत्तम दिसण्याची खात्री मिळते.'' या अभिनेत्रींचे उत्तम परफॉर्मन्स पाहण्यासाठी पाहत राहा मालिका 'भीमा' रात्री ८.३० वाजता, 'हप्पू की उलटन पलटन' रात्री १० वाजता आणि 'भाबीजी घर पर है' रात्री १०.३० वाजता दर सोमवार ते शुक्रवार फक्त एण्ड टीव्हीवर!

## राशी भविष्य

**मेष :** मालमत्तेच्या खरेदी-विक्रीशीसंबंधित कामात धावपळ करावी लागेल. याबाबत नीट विचार करून अंतिम निर्णय घ्या. पैशाची कमतरता जाणवेल. अनावश्यक खर्च टाळा.

**वृषभ :** आज तुमचे आरोग्य सुधारेल. कोणत्याही गंभीर आजाराने त्रस्त असलेल्या लोकांना त्यांच्या आरोग्याशी संबंधित खूप चांगली बातमी मिळेल. व्यवसायात उत्पन्न कमी आणि खर्च जास्त होईल.

**मिथुन :** आज अभिनय क्षेत्राशी संबंधित लोकांना विशेष यश आणि सन्मान मिळेल. नोकरीच्या शोधात घरापासून दूर जावे लागेल. तुम्हाला नोकरी मिळेल. तुम्हाला काही सरकारी योजनेची जबाबदारी मिळू शकते.

**कर्क :** एखाद्या मित्राची किंवा प्रिय व्यक्तीची तुम्हाला काळजी वाटेल. आज बँकेत जमा झालेले भांडवल अशा काही कामांवर खर्च होईल, ज्याची तुम्ही कधी कल्पनाही केली नसेल.

**सिंह :** आज जुन्या मित्राची भेट होईल. नित्यानंद मित्रांसोबत अनुभवास येईल. प्रेमसंबंधांमध्ये काही सुखद घटना घडू शकतात. नातेवाईकांच्या प्रकृतीवर जास्त पैसे खर्च केल्यामुळे कुटुंबात पैशाची कमतरता असेल.

**कन्या :** निरोगी लोकांना त्यांच्या शारीरिक शक्ती आणि मनोबलात मोठी वाढ जाणवेल. यामुळे ते जोश आणि उत्साहाने भरलेला असतील. आज आर्थिक बाबी काही चिंतेचा विषय असेल.

**तुळ :** आजच्या दिवसाची सुरुवात चांगल्या बातमीने होईल. राजकीय क्षेत्रातील व्यक्तींना जनतेचा मोठा पाठिंबा मिळेल. राजकारणाच्या क्षेत्रात जनतेचा मोठा पाठिंबा मिळेल. बेरोजगारांना रोजगार मिळेल.

**वृश्चिक :** राजकारणात विशिष्ट व्यक्तीशी जवळीक केल्याने फायदा होईल. कामाच्या ठिकाणी सहकाजयांशी जवळीक वाढेल. नोकरीत उच्च अधिकाजयांच्या निकटतेचा लाभ मिळेल.


**धनु :** आज आर्थिक क्षेत्रात चढ-उतारजाणवतील. जमिनीशी संबंधित जुना वाद मिटवून मोठी रक्कम प्राप्त होईल. आर्थिक क्षेत्रातील आर्थिक धोरणे चांगल्या प्रकारे समजून घ्या.

**मकर :** आज मुलांकडून आर्थिक मदत मिळण्याची शक्यता आहे. आर्थिक क्षेत्रात जुन्या उत्पन्नाच्या स्रोतांकडे अधिक लक्ष द्यावे लागेल. कष्टाच्या प्रमाणात पैशाचे उत्पन्न कमी राहील.

**कुंभ :** काही नवीन योजनांवर पैसा खर्च होण्याची शक्यता आहे. आज कुटुंबातील अनेक सदस्य तुमच्या कल्पनांना विरोध करू शकतात. यामुळे तुमच्या मनाला धक्का बसेल.

**मीन :** अविवाहित लोकांना त्यांच्या जोडीदाराशी संबंधित बातम्या मिळतील.प्रेमसंबंधात जोडीदाराशी जवळीक वाढेल. दूरच्या देशातून आलेल्या प्रिय व्यक्तीकडून तुम्हाला चांगला संदेश मिळेल.

## शब्दकोडे क्रमांक २०७२



**आडवे शब्द :-**
१) पुष्कळ
३) उणीव
८) इमारतीचा मूळ आधार
९) बेचव
१०) लोकांचे विचार
१२) निमंत्रणा
१४) रंगविलेले
१६) सटरफटर, किरकोळ सामान
१८) एक मिश्र धातू
१९) सहाय्य
२०) टरफल
२१) लक्ष्मी
२२) चित्त, लक्ष
२३) तलवारीचे घर
२४) गेरू
२६) ठोसा, घाव
२८) कर्णेंद्रिय
२९) घराचा मागचा दरवाजा
३१) पातक
३२) धनुष्यबाण
३५) कोवळे गवत
३७) मृत्युदेवता
३८) रम्य
४०) पत्नी
४२) आश्रय
४४) मीठ
४५) नगरवासी
४८) मान्यता
४९) हिस्सा
५०) धातूची तार काढणारा
५२) फायदा, प्राप्ती
५३) मदत करणारा
५६) शक्यता असलेला
५९) नंतर
६०) माफ
६३) भटक्या माणूस
६६) बाजेची सुती पट्टी
६८) कुबेराचा सेवक
७०) ** दमयंती
७१) कवितेतील एक शब्दालंकार
७२) एक आंबट तुरट चवीचे औषधी फळ
७३) जिनसांची यादी
७४) दु:खित

**उभे शब्द :-**
२) दात घासण्याचे चूर्ण
३) बशीचा जोडीदार
४) मध
५) चांदी
६) वडील
७) धोका
८) लेंगा
९) उत्सव
११) टप्प्याटप्प्याने केलेला प्रवास
१३) त्रासलेला
१५) कवी
१७) छोटा
१९) अंत:करण
२२) नरेंद्र मोदी यांचा पक्ष
२३) ब्रह्मदेशाचे नवीन नाव
२५) वस्त्र, कापड
२७) पोटविभाग
२८) कावळा
३०) दरवाजा
३३) दारूचा एक प्रकार
३४) वंदन
३६) अत्यंत तिखट मसालेभात
३९) शक्यतेप्रमाणे
४१) काम आटोपणे
४३) सीतापती
४६) मगज
४७) सत्वांश
५०) शत्रू
५२) हितावह, प्राप्ती करून देणारा
५४) विजयादशमी
५५) सर्वत्र
५७) पाणी
५८) संगीतातील एक राग
६१) मनुष्य
६२) लोणच्यातील द्रव मसाला
६४) टाळूच्या सहाय्याने निघणारा आवाज उदा. ट, ठ, ण
६५) मृत
६७) खस
६९) माफ

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर





# टेस्टी नाश्ता

खादाडी

दोस्तांनो, सकाळचा नाश्ता म्हणून किंवा अगदी संध्याकाळचं खाणं म्हणून तुम्ही एग अँड बनाना पॅन केक बनवू शकता. पटकन होणारी, अगदी साधी आणि सुटसुटीत अशी ही रेसिपी तुमच्यासाठी अगदी योग्य आहे.

**साहित्य :** दोन अंडी, एक मध्यम आकाराचं केळं, किसलेलं खोबरं, वेलची किंवा दालचिनी पूड, सुकामेवा. फक्त अंडं आणि केळं या दोन घटकांचा वापर करूनही पॅनकेक तयार करता येईल.

**कृती:** एका भांड्यात केळं कुस्करून घ्या. दोन अंडी फोडून फेटून घ्या. ही फेटलेली अंडी केळ्यात नीट मिसळून घ्या. त्यात आवडीनुसार खोबरं, सुकामेवा, वेलची पूड घाला. आता गॅसवर तवा ठेवा. त्यावर तेल किंवा बटर घाला. केळं आणि अंड्याचं मिश्रण तव्यावर पसरून घ्या. एका बाजूने शिजल्यावर केक उलटा. दुसरी बाजू नीट भाजली गेली की ताटात काढून घ्या. हा केक गरम किंवा थंड कसाही खाता येईल.




# नोकरीऐवजी शेतीचा स्टार्टअप

अचिव्हर

साधारणपणे अभियांत्रिकीचे शिक्षण घेणाऱ्या तरुणांनी आयआयटीमधून शिक्षण घेतल्यास त्यांना बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये चांगल्या नोकरीच्या ऑफर मिळतात. महिन्याला लाखो रुपये पगार दिला जातो. काही तरुणांना करोडो रुपयांचे पॅकेज मिळते. पण बहुराष्ट्रीय कंपन्यांची ऑफर सोडून स्वत:चा व्यवसाय सुरू करणाऱ्या आणि वार्षिक उलाढाल ५० कोटींच्या घरात नेणाऱ्या अनिश जैन या तरुणाचे नाव तुम्ही जाणता का? त्याने अनेकांपुढे आदर्श निर्माण केला आहे. आज या अचिव्हरबद्दल जाणून घेऊ या.

अनिश जैन याने आयआयटी खरगपूरमधून अभियांत्रिकीचे शिक्षण पूर्ण केले खरे परंतु, नोकरीची ऑफर नाकारुन त्याने स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याचा निर्णय घेतला. आज त्याचे यश सर्वांना प्रेरित करत आहे. त्याच्या या व्यवसायामुळे शेतकऱ्यांचे प्रश्न सुटत आहेत. पिकवितो त्याला योग्य भाव मिळत नसल्याचे त्याने पाहिले. खरेतर अनेक कंपन्यांना दर्जेदार मालाची गरज असते. परंतु तसा शेतीमाल योग्य वेळी मिळत नाही. ही परिस्थिती आणि वस्तुस्थिती पाहून अनिश जैनला व्यवसायाची कल्पना सुचली व त्याने दर्जेदार पिके घेणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये आणि चांगल्या पिकांची गरज असणाऱ्या कंपन्यांमध्ये दुवा म्हणून काम करण्यास सुरुवात केली.



**ग्राम उन्नती स्टार्टअप**

यानंतर त्याने २०१३ मध्ये 'ग्राम उन्नती' स्टार्टअप सुरू केले. त्याचे मुख्य काम इतर आणि मोठ्या कंपन्यांमध्ये मध्यस्थ म्हणून काम करणे हे होते. यायोगे शेतकऱ्यांना पिकाला योग्य भाव मिळेल आणि कंपन्यांना त्यांच्या गरजेनुसार चांगल्या दर्जाची पिके मिळतील, हा उद्देश होता.

हा व्यवसाय सुरू करण्यासाठी त्याला खूप धडपड करावी लागली. सुरुवातीच्या काळात कुटुंबीयांची मदत घ्यावी लागली. त्याने काही मित्र आणि नातेवाइकांकडून पैसेही घेतले. यातूनच त्याने स्वत:चा स्टार्टअप सुरू केला आणि बघता बघता व्यवसायात पूर्ण जोमाने काम सुरू केले. त्यामुळे त्याला चांगले यश मिळाले.

कंपनीचे काम आणि उलाढाल

आज त्याची कंपनी आठ



राज्यांमध्ये दर्जेदार सेवा देते. भाज्या, धान्य, तेलबिया, फळे, मसाले इत्यादी मालाच्या विक्रीचा त्यात समावेश आहे. राजस्थानमधील शेतकरी सोयाबीन किंवा मोहरीची लागवड करतात. कंपनी त्यांच्याशी करार करुन काम करते. आतापर्यंत त्याने लाखो शेतकरी साखळीमध्ये गुंफले आहेत. आता 'ग्राम उन्नती' दरवर्षी जवळपास ५० कोटी रुपयांची उलाढाल करत आहे. अभियांत्रिकी नोकरी करत असता तर त्याला फार तर ५० लाखांचे वार्षिक पॅकेज मिळाले असते, हे इथे लक्षात घ्यायला हवे.

## फंडू एसएमएस

किसी को भी व्होट मिले
किसी का भी प्रचार हो,
बस तू मेरा रहे,
इस दिल में तेरीही सरकार हो।

सारे दोस्त काम के,
सबका अपना रोल,
जो संकट में साथ दे,
वो है सबसे अनमोल।

कामियाबी का
जुनून होना चाहिये
फिर मुश्किलों की
क्या औकात?

फिटनेस फंडा

### भारतात 'ॲपल आयपॅड'ची विक्री सुरू

'ॲपल'च्या आयपॅड एअर एम ३, आयपॅड ए१६, मॅकबुक एअर एम ४ आणि मॅक स्टुडिओ (एम ३ अल्ट्राआणि एम ४ मॅक्स) ची भारतात विक्री सुरू झाली आहे. आता ते कंपनीच्या अधिकृत स्टोअर आणि पुनर्विक्रेत्यांकडून खरेदी केले जाऊ शकतात.



एंट्री-लेव्हल आयपॅड ए १६ वगळता सर्व उत्पादने 'ॲपल' इंटेलिजन्स वैशिष्ट्यांना समर्थन देतात. 'आयपॅड १६' हे सर्वात परवडणारे उत्पादन असून त्याचे १२८ जीबी स्टोरेज असणारे बेस व्हेरिएंट ३४,९०० रुपयांना खरेदी केले जाऊ शकते. 'आयपॅड एअर'ची किंमत ५९,९०० रुपयांपासून सुरू होते. ही उत्पादने निळ्या, जांभळ्या, स्टारलाइट आणि स्पेस ग्रे रंगांमध्ये उपलब्ध आहेत. 'आयपॅड ए १६' निळ्या, गुलाबी, पिवळ्या आणि चंदेरी रंगांमध्ये खरेदी करता येतील. 'आयपॅड ए १६' मध्ये ११ इंचाचा लिक्विड रेटिना डिस्प्ले असून तो ॲपल पेन्सिल आणि मॅजिक की बोर्डला सपोर्ट करतो. हे गॅझेट ए१६ चिपसेटने सुसज्ज आहे. 'आयपॅड एअर एम ३' चिपसेटसह आहे. ते एम १ च्या तुलनेत दुप्पट चांगली कामगिरी देत असल्यामुळे सामग्री तयार करणे आणि गेमिंगसह सर्व काम सहज आणि गतीने पूर्ण होऊ शकतात.

फिटनेस फंडा

### मॅकबुक एअर एम ४

मॅक स्टुडिओ मॅकबुक एअर एम ४ ची किंमत ९९,९०० रुपयांपासून सुरू होते. एम ४ चिपसेटमुळे मॅकबुक एअरमध्ये मल्टीटास्किंगची सगळीच म्हणजे फोटो आणि व्हिडीओ एडिटिंगसारखी कामेही पूर्वीपेक्षा जलद होतील. नवीन मॅकबुक एअर मॉडेल्समध्ये १ एमपी सेंटर स्टेज कॅमेरा आहे. व्हिडिओ कॉल दरम्यान वापरकर्त्याला फ्रेममध्ये ठेवण्यासाठी ते स्वयंचलितपणे कॅमेरा समायोजित करते. मॅक स्टुडिओबद्दल बोलायचे तर ही कंपनीची भारतातील सर्वात महागडी ऑफर आहे. एम ३ अल्ट्रासह पूर्ण लोडेड मॅक स्टुडिओची किंमत १४ लाख ३९ हजार ९०० रुपये ठेवण्यात आली आहे.



फिटनेस फंडा

### 'स्मार्टवॉच'च्या मागणीत घट




आता 'स्मार्टवॉच'ची मागणी कमी होऊ लागली आहे. २०२४ मध्ये स्मर्टवॉच उद्योगाच्या गतीला ब्रेक लागला असून जागतिक शिपमेंटमध्ये सात टक्के घट दिसून आली आहे. या उद्योगात पहिल्यांदाच घसरण दिसून आली आहे. तथापि, चीनमध्ये 'स्मार्टवॉच'ची मागणी अजूनही कायम आहे आणि त्याने उत्तर अमेरिका आणि भारताला मागे टाकत जागतिक स्मार्टवॉच शिपमेंटमध्ये सर्वात मोठा वाटा मिळवला आहे.



# भारतीय सैन्यात भरतीसाठी संधी

सुवर्णसंधी

भारतीय सैन्यात भरती होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या तरुणांसाठी एक मोठी संधी आहे. नुकतीच 'अग्निवीर' भरतीची अधिसूचना जारी करण्यात आली आहे. त्यासाठी ऑनलाइन अर्ज भरण्यास सुरुवातही झाली आहे. इच्छुक उमेदवार १० एप्रिलपर्यंत अर्ज करू शकतात.

या भरती अंतर्गत, अग्निवीर जनरल ड्युटी, अग्निवीर लिपिक/स्टोअर कीपर, अग्निवीर ट्रेड्समन, मिलिटरी टेक्निकल नर्सिंग यासह विविध पदांवर भरती केली जाईल. भरतीची लेखी परीक्षा जून २०२५ मध्ये आयोजित केली जाऊ शकते. तथापि, अचूक तारखेसाठी उमेदवारांनी अधिकृत वेबसाइट डब्यु.डब्यु.डब्यु. जॉईनइंडियनआर्मी.निक.एन वर लक्ष ठेवावे लागेल.

**अर्ज करण्यासाठी पात्रता काय?**

अग्निवीर जनरल ड्यूटी (जीडी) पदांसाठी, उमेदवाराने ४५ टक्के गुणांसह मॅट्रिक उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. उमेदवाराकडे हलके मोटार वाहन चालविण्याचा परवाना असेल तर त्याला चालक पदासाठी प्राधान्य दिले जाईल. अग्निवीर तांत्रिक पदांसाठी ५० टक्के गुणांसह १२ वी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. ज्यामध्ये भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित आणि इंग्रजी हे अनिवार्य विषय असावेत.

**अर्ज करण्यासाठी किती फी?**

या भरतीसाठी, सर्व श्रेणीतील (सामान्य, ओबीसी, एसटी, एससी, ईडबल्यूएस) उमेदवारांना २५० रुपये अर्ज शुल्क भरावे लागेल. ते फक्त ऑनलाइन पद्धतीने स्वीकारले जाईल. ही आहेत महत्त्वाची कागदपत्रे अर्जासाठी १० वी आणि १२ वीची मार्कशीट, प्रमाणपत्र, स्कॅन केलेली स्वाक्षरी, पासपोर्ट आकाराचा फोटो आणि जात प्रमाणपत्र (लागू असल्यास) आवश्यक असेल.

**कसा कराल अर्ज?**

अर्ज करण्यासाठी, उमेदवारांना भारतीय लष्कराच्या अधिकृत वेबसाइटला भेट द्यावी लागेल आणि आवश्यक कागदपत्रे अपलोड करून ऑनलाइन अर्ज भरावा लागेल. शेवटच्या तारखेनंतर कोणत्

# योगा सुरू करताय?

फिटनेस फंडा

सध्या फिटनेससाठी योगासनांवर भर दिला जातो. योगाचे शारीरिक आणि मानसिक असे दोन्ही लाभ आहेत. योगा केल्याने शरीर बळकट होण्यासोबतच मनही शांत होतं. बरीच तरुण मंडळी योगा क्लासला जातात. तुम्हीही नव्यानेच योगा सुरू केला असेल तर या टिप्स फॉलो करा.

* चांगला योगा प्रशिक्षक तुमच्या जगण्याची दिशा बदलू शकतो. नव्याने सुरूवात करत असाल तर योगाच्या प्राथमिक प्रशिक्षण वर्गांना जा. योगासनांमुळे तुमच्या शरीरावर होणाऱ्या परिणामांचं निरिक्षण करा. काही आसनं सुरूवातीला थोडी अवघड वाटली तरी सवयीने ती तुम्हाला नक्की जमतील.




* योगाला जाताना ढगळ, आरामदायी कपडे घाला. जीममधले कपडे योगा करताना चालणार नाहीत. योगा हा इतर व्यायामांपेक्षा पूर्णपणे वेगळा प्रकार आहे. योगा करताना शरीर ताणावं लागतं. त्यामुळे योगा पँट्सची निवड करा.

* योग वर्गांचं आयोजन केलं जातं. ठराविक वेळी हे वर्ग सुरू होतात. त्यामुळे या ठिकाणी वेळेत पोहोचणं गरजेचं असतं. जीममध्ये तुम्ही कधीही जाऊ शकता. मात्र योगाचं तसं नसतं.

* योगा करताना डिओ किंवा परफ्युमची फार गरज नसते. त्यामुळे अंगावर फार परफ्युम फवारू नका. तुमच्या परफ्युमचा सुगंध इतरांना त्रासदायक ठरू शकतो.

* तुमच्या काही विशेष गरजा असतील तर त्याबद्दल योग प्रशिक्षकाशी सविस्तर बोलून घ्या. एखादं आसन करताना त्रास होत असेल तर त्यामागची कारणं जाणून घ्या.

* जीममध्ये व्यायाम करता करता फोन वापरता येतो. मात्र योगा करताना फोन बंदच ठेवा. शांत आणि प्रसन्न मनाने योगा करा. यामुळे तुमचा संपूर्ण दिवस उत्साहात जाईल.




# 'ओपन एआय' 'सोरा' मॉडेल चॅटजीपीटीत आणणार

टेक्नो टॉक

'ओपन एआय' ने यापूर्वीच 'सोरा' नावाचे एक टेक्स्ट-टू-व्हिडिओ मॉडेल लाँच केले आहे. हे सध्या त्यांच्या अधिकृत वेबसाइटवर उपलब्ध आहे. आता कंपनी हे सोरा मॉडेल थेट 'चॅटजीपीटी' मध्ये आणण्याच्या तयारीत आहे. त्यामुळे यूजर्सना केवळ चॅटबॉटकडून उत्तर मिळवण्याऐवजी थेट व्हिडीओ जनरेट करण्याची सुविधाही मिळू शकते.

'ओपन एआय' च्या सोरा प्रॉडक्टचे प्रमुख रोहन सहाय यांनी सांगितले की, या मॉडेलला 'चॅटजीपीटी'मध्ये समाविष्ट करण्याच्या दिशेने काम सुरू आहे. मात्र याबाबत कोणतीही तारीख नक्की झालेली नाही. 'चॅटजीपीटी' मधील सोरा व्हर्जनमध्ये वापरकर्त्यांना मूळ वेबसाइटच्या तुलनेत कमी कंट्रोल मिळू शकतो. म्हणजेच स्वतंत्र सोरा वेबसाइटवर अधिक सखोल सेटिंग्ज आणि पर्याय असतील तर 'चॅटजीपीटी' मध्ये त्याचे थोडे साधे व्हर्जन असेल.

**'सोरा' स्वतंत्र का लाँच करण्यात आला?**

रोहन सहाय यांनी स्पष्ट केले, की 'चॅटजीपीटी' मध्ये आणखी फीचर्स जोडल्याने ते जास्त अवघड होण्याचा धोका होता. त्यामुळेच 'सोरा'ला स्वतंत्र ठेवण्यात आले होते. मात्र आता 'एआय' क्षेत्रातील स्पर्धा झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे 'ओपन एआय' व्हिडिओ जनरेशन फीचरचा 'चॅटजीपीटी' मध्ये समावेश करून ते इतर स्पर्धकांपेक्षा एक पाऊल पुढे येण्याच्या तयारीत आहे.




**चीनच्या कंपन्यांमुळे वाढलेली स्पर्धा**

गेल्या काही महिन्यांत चिनी 'एआय' कंपन्यांनी अनेक अत्याधुनिक मॉडेल्स लाँच केली आहेत. त्यामुळे अमेरिकी कंपन्यांसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. विशेषतः 'डीपसेक' नावाच्या चिनी स्टार्टअपने अतिशय स्वस्त आणि प्रभावी 'एआय' मॉडेल आणून मोठा धमाका केला. त्यामुळे ओपन 'एआय' आणि इतर कंपन्यांवर जास्तीत जास्त फीचर्स आणण्याचा दबाव वाढला आहे. 'चॅटजीपीटी' मध्ये व्हिडीओ जनरेशन या फीचरचा समावेश झाला तर हे 'एआय' क्षेत्रातील मोठे पाऊल ठरेल, यात शंका नाही. सध्याच्या काळात 'ओपन एआय' त्याच्या 'सोरा' मॉडेलला 'चॅटजीपीटी' मध्ये आणण्याच्या दिशेत काम करत असल्यामुळे वापरकर्त्यांना अधिक सहज आणि सोपी व्हिडिओ जनरेशन सेवा मिळू शकते. मात्र, 'ओपन एआय' या फीचरची अधिकृत घोषणा कधी करेल आणि त्यात काय काय सुविधा असतील? हे आगामी काळातच समजू शकेल.



# बेस्ट फॉर ऑफिस लूक

फॅशन पॅशन

'चिनोज' हा तरुणांच्या वॉर्डरोबमधला सर्वात वैविध्यपूर्ण असा बॉटमचा प्रकार. याचं महत्त्वाचं कारण म्हणजे चिनोज फॉर्मल ट्राउझर आणि जीन्स यांच्या मधला प्रकार आहे. त्यातच या दोघांपेक्षा चिनोज अधिक आरामदायी असतात. म्हणूनच ऑफिसमध्ये चिनोज अगदी सहज कॅरी करता येतात. ऑफिस लूकसाठी चिनोज कशा वापरायच्या याविषयी...

* तुम्ही एखाद्या स्टार्टअपमध्ये नोकरी करत असाल आणि तिथे फॉर्मल ड्रेसकोड नसेल तर चिनोज विविध पद्धतींनी घालता येईल. तुमच्या चिनोजला जीन्स समजा. त्यावर कॅज्युअल टी शर्ट, प्लेड शर्ट किंवा दोन्ही घाला. यावर स्नीकर्स कॅरी करा.

* फॉर्मल लूकसाठी चिनोजवर चेक्स, प्लेन किंवा स्ट्राईपवाला शर्ट घालता येईल. यावर टायही लावता येईल.

* चिनोज तुम्ही वर्षभर कॅरी करू शकता. उन्हाळ्यात पेस्टल शेड्सच्या कॉटन चिनोजची निवड करा. या दिवसात काही भडक रंगही ट्राय करता येतील. लाल, निळ्या, हिरव्या रंगातल्या शेड्सचा विचार करायला हरकत नाही.

* फॉर्मल लूकमध्ये असाल तर चिनोजसोबत ऑक्सफर्ड, ब्रॉज किंवा लोफर यापैकी एखादे शूज घाला.

* कॅज्युअल लूकसाठी व्हाईट स्नीकर्स हा सर्वात बेस्ट पर्याय आहे. मात्र पांढऱ्या चिनोजवर त्याच रंगाचे स्नीकर्स घालू नका. तसंच चिनोज आणि स्नीकर्सचा रंग एक असणार नाही,याची काळजी घ्या.

# तीन हजारापेक्षा अधिक जन्म, मृत्यू प्रमाणपत्र रद्द

■ महासागर प्रतिनिधी
वाशिम, दि. ३१ :

जिल्ह्यात नायब तहसीलदारांनी निर्गमित केलेले तीन हजार २२० जन्म व मृत्यू प्रमाणपत्र रद्द करण्याचा आदेश जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस. यांनी दिला.

रद्द केलेल्या प्रमाणपत्र प्रकरणी फेरचौकशी करून निर्णय घेतला जाणार आहे.जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ (सुधारणा अधिनियम २०२३) मधील कलम १३ (३) अन्वये ज्या कोणत्याही जन्माची किंवा मृत्यूची तो घडल्यानंतर एक वर्षाच्या आत नोंदणी करण्यात आली नसेल त्याची नोंदणी खातरजमा करून जिल्हा दंडाधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी किंवा प्राधिकृत कार्यकारी दंडाधिकारी यांनी दिलेल्या आदेशावरुन करण्याची तरतूद आहे.

वाशीम जिल्ह्यात कार्यकारी दंडाधिकारी यांना अधिकार प्रदान करण्यात आले होते. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आदेशान्वये नायब तहसीलदार महसूल व निवासी नायब तहसीलदार यांना अधिकार दिले होते. या अधिकारानुसार वाशीम जिल्ह्यात तीन हजार ०६३ जन्म, तर १५७ मृत्यू असे एकूण तीन हजार २२० प्रमाणपत्र नायब तहसीलदारांनी निर्गमित केले होते.

यामध्ये वाशीम तालुक्यात ३७८, मालेगाव ४१८, रिसोड ५३४, मंगरुळपीर ९६९, कारंजा ५२२ व मानोरा तालुक्यातील ३९९ प्रमाणपत्रांचा समावेश आहे.

राज्य शासनाच्या १७ मार्चच्या पत्रानुसार अकोला जिल्ह्यासह राज्यात ११ ऑगस्ट २०२३ पासून स्थगित आदेशापर्यंत निर्गमित झालेल्या जन्म व मृत्यू प्रमाणपत्रांपैकी तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी या पदापेक्षा कमी दर्जाच्या अधिकाऱ्यांनी निर्गमित केलेले प्रमाणपत्र रद्द करण्यात येत आले.

त्यांची सक्षम अधिकाऱ्यांकडून फेरतपासणी करुन त्यावर निर्णय घ्यावा, अशा सूचना राज्यातील सर्व विभागीय आयुक्त व जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

त्यानुसार वाशीम जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील सर्व नायब तहसीलदार महसूल व निवासी नायब तहसीलदार यांनी जन्म व मृत्यू आदेश किंवा प्रमाणपत्र निर्गमित केलेले आदेश रद्द करून त्यांची फेरचौकशी करण्याचा निर्णय घेतला. या आदेशामुळे बनावट व बोगस कागदपत्रांद्वारे प्रमाणपत्र मिळवणाऱ्यांना चांगलाच मोठा धक्का बसला आहे.

उशिराने जन्म व मृत्यू नोंदणी करून तहसीलदारांपेक्षा कमी दर्जाच्या अधिकाऱ्यांनी निर्गमित केलेले प्रमाणपत्र रद्द करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य शासनाने घेतला. या प्रकारे निर्गमित केलेल्या प्रमाणपत्रांची सक्षम अधिकाऱ्यांमार्फत फेरतपासणी केली जाणार आहे.

# महासागर कर्मयोगी पुरस्कार २०२५ चे ५ एप्रिल रोजी वितरण


कमलाकर धारप


पद्मश्री डॉ. विलास डांगरे


डॉ. हरीश धुरट



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३१ :

गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर मुहूर्तमेढ झालेला दैनिक महासागर ५५ व्या वर्षात पदार्पण करीत आहे. त्या प्रित्यर्थ शनिवार ५ एप्रिल रोजी 'महासागर कर्मयोगी पुरस्कार' वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

प्रत्येकी २५ हजार रुपये रोख, शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. कायदे पंडित सेवानिवृत्त न्यायमूर्ती विजय डागा यांच्या अध्यक्षतेखाली पुरस्कार वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, राज्याचे महसूल मंत्री तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, नागपूर शहराचे पोलीस आयुक्त डॉ. रवींद्र सिंगल, उद्योगपती प्रकाश वाघमारे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या हस्ते मान्यवरांना पुरस्कार प्रदान करण्यात येईल

रूग्णांची अविरत सेवा करणारे पद्मश्री डॉ. विलास डांगरे यांना वैद्यकीय क्षेत्रातील योगदानासाठी तर जेष्ठ पत्रतपस्वी कमलाकर धारप यांना पत्रकारिता क्षेत्रातील त्यांच्या योगदानासाठी हा पुरस्कार दिला जाणार आहे .तळागाळातील व्यक्तींच्या विकासासाठी झटणारे डॉ. हरीश धुरट यांनाही कर्मयोगी पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार असून, सामाजिक क्षेत्रासाठीचा पुरस्कार सेवाभावी संस्था म्हणून प्रगती राजस्थानी महिला मंडळ यांना प्रदान करण्यात येणार आहे.

शनिवार ५ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता माहेश्वरी भवन, टेकडी मार्ग, सीताबर्डी, नागपूर येथे आयोजित कार्यक्रमास सर्व समाज बांधवांनी आवर्जून उपस्थित रहावे असे आवाहन दैनिक महासागरचे मुख्य संपादक श्रीकृष्ण चांडक, सीईओ उमाशंकर लाल, निवड समिती सदस्य प्रभाकर दुपारे, राहुल चांडक, पंकज चांडक, विशाल चांडक, प्रवीण डबली, कमल नामपल्लीवार व समस्त महासागर वृत्तपत्र समूह परिवारातर्फे करण्यात आले आहे.

# औरंगजेबाची कबर भारताच्या उदारतेचे प्रतीक

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३१ :



राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे माजी सरकार्यवाह भय्याजी जोशी यांनी औरंगजेबाच्या कबरीवरून निर्माण झालेल्या वादावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी सांगितले की औरंगजेबाची कबर ही भारताच्या उदारतेचे आणि सर्वसमावेशकतेचे प्रतीक आहे.

जोशी यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे उदाहरण देत सांगितले की त्यांनी प्रतापगडाच्या पायथ्याशी अफजल खानाची कबर बनवली होती. त्यांनी स्पष्ट केले की औरंगजेबाचा मृत्यू इथे झाल्याने त्याची कबर इथे बांधली गेली आहे. या विषयावर मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी गुढीपाडवा मेळाव्यात वेगळी भूमिका मांडली होती. त्यांनी औरंगजेबाच्या सजवलेल्या कबरीवर बोर्ड लावण्याची मागणी केली होती. त्यावर 'मराठ्यांना संपवायला आलेला औरंगजेब येथे गाडला गेला' असे लिहावे, असे त्यांचे म्हणणे होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणी कायदेशीर बाजू मांडली आहे. त्यांनी स्पष्ट केले की औरंगजेबाच्या कबरीला भारतीय पुरातत्व खात्याने संरक्षित स्मारकाचा दर्जा दिला आहे. साठ वर्षांपूर्वी कबरीला मिळालेल्या कायदेशीर संरक्षणामुळे तिचे जतन करणे आवश्यक आहे.

भय्याजी जोशी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यक्रमाचाही उल्लेख केला. त्यांनी माधव नेत्रालयाच्या विस्तारित इमारतीच्या पायाभरणीचे काम लवकरच पूर्ण होईल, असे सांगितले. संघातील उत्तराधिकाराबाबत त्यांनी सांगितले की सध्या हा विषय नसून परंपरेनुसार सर्व होईल.

# वाघाच्या हल्ल्यात शेतकऱ्याचा बळी

## गावकरी संतप्त : नाना पटोलेंनी घेतली कुटुंबाची भेट



■ महासागर प्रतिनिधी, भंडारा, दि. ३१ :

भंडारा जिल्ह्याच्या लाखांदूर तालुक्यातील खैरी/पट येथील शेत शिवारात संध्याकाळी शेतात पिकांना पाणी देण्यासाठी गेलेल्या एका शेतकऱ्यावर वाघाने हल्ला केला. या हल्ल्यात शेतकऱ्याचा मृत्यू झाला. ही घटना सोमवार, ३१ मार्च रोजी सकाळी खैरी/पट येथील शेत परिसरात घडली. डाकराम गोपीचंद देशमुख (४०) असे मृतकाचे नाव आहे.

१ महिन्यापासून तालुक्यामधील गवराला, डांभेविरली, टेंभरी, विहिरगाव, खैरी/पट, असोला, सावरगाव, नांदेड इत्यादी गावांच्या शेतजमिनीत वाघ मुक्तपणे फिरत असल्याची चर्चा होती. गेल्या काही दिवसांत, या वाघाने ३ गुरांची शिकार केली. वरील घटनांची दखल घेत, नियमित गस्त घालण्यात आली आणि स्थानिक लाखांदूर वन विभागाच्या अंतर्गत वाघाच्या व्यवस्थापनासाठी पिंजरा देखील लावण्यात आला. परंतु, वाघाला पकडण्यात वन विभागाला यश आले नाही. या काळात, शेतकऱ्यांनाही सावधगिरीचा इशारा देण्यात आला होता.

दरम्यान, रविवारी, ३० मार्च रोजी सायंकाळी ५ वाजताच्या सुमारास, घटनेतील पीडित शेतकरी स्थानिक खैरी/पट शेत परिसरात त्याच्या मालकी शेतातील पिकांना सिंचनासाठी कृषी पंपासह शेतात पाईप बसवण्यासाठी गेला होता. यावेळी शेतात पेरलेल्या मक्याच्या पिकात लपलेल्या वाघाने पीडित शेतकऱ्यावर हल्ला करून त्याची शिकार केली. शेतकरी रात्री उशिरापर्यंत घरी न परतल्याने कुटुंबातील सदस्यांनी चिंता व्यक्त केली. यावेळी, स्थानिक ग्रामस्थ, वन अधिकारी आणि पोलिस कर्मचारी, कुटुंबातील सदस्यांसह रात्रीच्या वेळी शेत परिसरात गेले आणि शेतकऱ्याचा शोध घेण्यास सुरुवात केली.

सोमवारी, सकाळी पीडित शेतकऱ्याचा मृतदेह शेतातील मक्याच्या पिकात आढळला. वाघाने शेतकऱ्याची शिकार केल्याची माहिती स्थानिक ग्रामस्थांना मिळताच सर्वत्र संताप व्यक्त करण्यात आला. यावेळी, लाखांदूर येथील वन परिक्षेत्र कार्यालयाच्या आवारात शेकडो ग्रामस्थांनी पीडित शेतकऱ्याच्या कुटुंबाला तत्काळ आर्थिक मदत, एका सदस्याला सरकारी नोकरी आणि इतर मागण्यांसाठी निदर्शने केली. यावेळी, साकोलीचे सहाय्यक वनसंरक्षक संजय मेंढे, पवनीचे उपविभागीय पोलिस अधिकारी मनोज सिडाम, ठाणेदार सचिन पवार, वनपरिक्षेत्र अधिकारी प्रदीप चन्ने यांच्यासह इतर कर्मचारी आणि स्थानिक खैरी/पटचे सरपंच आणि पोलिस पाटील यांच्या उपस्थितीत पीडित शेतकऱ्याच्या कुटुंबाला तत्काळ १० लाखाचा धनादेश देत ५०,००० रोख रुपयाची आर्थिक मदत देण्यात आली.

घटनेची माहिती मिळताच, साकोलीचे आमदार नाना पटोले तातडीने पीडित शेतकऱ्याच्या घरी पोहोचले. पटोले यांनी कुटुंबातील सदस्यांचे सांत्वन केले आणि वाघाला पकडण्याच्या सूचना वनखात्याला दिल्या. तहसीलदार वैभव पवार, उपविभागीय पोलिस अधिकारी मनोज सिडाम, पोलिस स्टेशन अधिकारी सचिन पवार, सहाय्यक पोलिस स्टेशन अधिकारी आशिष गंद्रे, तहसील काँग्रेस अध्यक्ष प्रदीप बुराडे, प्रा. पी.एम. ठाकरे, रामचंद्र राऊत यावेळी उपस्थित होते.

# बायकोच्या छळाला कंटाळून तलाठ्याची आत्महत्या

■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. ३१ :

येथील तेल्हारा तहसील कार्यालयाच्या अंतर्गत तलाठी म्हणून कार्यकरत असलेले शिलानंद तेलगोटे यांनी रविवारी पत्नीच्या मानसिक छळाला कंटाळून आत्महत्या केली आहे. या घटनेने अकोला जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे. शिलानंद तेलगोटे यांनी गळफास घेत आपले जीवन संपवले असल्याचे समोर आले आहे.



तलाठी शिलानंद तेलगोटे यांनी आत्महत्या करण्यापूर्वी व्हॉटसअपवर स्टेटस ठेवले होते. यात त्यांनी त्यांच्या आत्महत्येचे कारण स्पष्टपणे लिहिले आहे. आपली पत्नी आपला मानसिक छळ करत असल्याचे तसेच अश्लील शिव्या देत असल्याचे शिलानंद तेलगोटे यांनी स्पष्ट लिहिल्याचे दिसून आले आहे. तसेच माझ्या मृत्यूनंतर माझा चेहरा पत्नीला दाखवू नये, असेहीह तेलगोटे यांनी स्टेटसमध्ये म्हटले आहे. पोलिसांनी शिलानंद तेलगोटे यांचा मृतदेह ताब्यात घेतला असून शवविच्छेदनासाठी तेल्हारा ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. तलाठी शिलानंद तेलगोटे यांचा मृतदेह तेल्हारा ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आला असून पुढील तपास शवविच्छेदनाच्या रीपोर्टवर अवलंबून असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.

शिलानंद तेलगोटे यांनी आत्महत्या करण्यापूर्वी मृत्यूपत्र देखील तयार केले असल्याचे समोर आले आहे. यात त्यांनी आपली सर्व संपत्ती मुलाच्या नावावर केली असल्याचे समजते.

: हॅलो डॉक्टर :




## मूत्रपिंडाचे आजार व उपचार

लोकरोग्य

संपूर्ण मानवी शरीराला नियंत्रित करणारे जे काही महत्वाचे अवयव आहेत त्यामध्ये मूत्रपिंड हा अवयव अत्यंत महत्वाचा असा अवयव आहे. हृदयकडून पुरवठा होणारे रक्त हे मूत्रपिंडाद्वारेच मेंदूपर्यंत पोहचते. म्हणूनच मूत्रपिंड हा अवयव हा मानवी जगण्याचा एक आधार आहे असं म्हटलं तरी ती अतिशयोक्ती ठरणार नाही. परंतु अनेकदा आपल्या शरीरातील काही आजारामुळे किंवा व्यसनामुळे मूत्रपिंडाला दुखापत होते आणि मूत्रपिंडाचे आजार उद्भवतात. या आजारामुळे शरीराचे अंतर्गत सुरळीत चक्र हे बिघडते. मुळात मूत्रपिंडाचे आजार नेमके कोणते असतात?आणि त्यावर उपचार कोणकोणते आहेत? याच प्रश्नाची उकल करण्यासाठी लैंगिक विकार तज्ज्ञ डॉ. राजन भोसले यांच्याशी बातचीत.

**मानवी शरीराचा अत्यंत महत्वाचा अवयव असलेल्या मूत्रपिंडाचे कार्य काय आहे?**

■ आपल्याकडे मानवाची शारीरिक रचना अशी असते कि प्रत्येकाला दोन मूत्रपिंड असतात. हे बिनच्या आकाराचे अवयव आपल्या पाठीच्या बाजूला मणक्याच्या दोन्ही बाजूला बरगड्यांच्या खाली असतात. मूत्रपिंडाची अनेक काम आहेत,परंतु सर्वात महत्वाचं कार्य म्हणजे शरीरातील रक्ताचे शुद्धीकरण करणे, शरीरातील विषारी पदार्थ,कचरा आणि जास्तीचे पाणी मुत्रासारख्या पदार्थापासून मुक्त करणे हे महत्वाचे कार्य आहे.

मूत्रपिंड हे शरीरातील इलेक्ट्रोड्स जसे कि मीठ आणि पोटॅशिअम तसेच खनिजांचे प्रमाण देखील संतुलित करतात. रक्तदाब नियंत्रित करणारे हार्मोन्स बनवतात. लाल रक्तपेशी बनवून तुमची हाड देखील मजबूत ठेवतात.

**मूत्रपिंडाचा दीर्घकालीन आजार काय?**

■ क्रोनिक किडनी डिसीज म्हणजे तुमच्या मूत्रपिंडाला नुकसान झाले आहे,आणि हि मूत्रपिंड ज्या पद्धतीने काम करायला हवे त्याप्रमाणे करत नाहीत. मूत्रपिंड हि फिल्टर सारखी असतात आपल्या शरीरातील विषारी पदार्थ आणि अतिरिक्त पाणी बाहेर फेकण्याचे काम करतात जे ते खराब झाले तर करत नाहीत. कालांतराने क्रोनिक आजारात मूत्रपिंडाचे नोकरी हळूहळू कमी होते. आणि अगदी शेवटच्या टप्प्यात हि मूत्रपिंड निकामी देखील होऊन मनुष्य दगावतो. मात्र मूत्रपिंडाचे नुकसान कमी करण्यासाठी डायलिसिस करू शकतो.

**मूत्रपिंडाच्या आजाराची कारण आणि लक्षण काय असतात?**

■ मूत्रपिंडाच्या आजारात सुरवातीला सहसा लक्षण दिसत नाहीत. आजार जसजसा वाढत जातो तास तशी हि लक्षण दिसू लागतात. सतत लघवीला येणे,थकवा,अशक्तपणा जाणवणे,धाप लागणे,भूक मंदावने,डोळे सुजणे,लघवीत फेस येणे,कोरडी किंवा खाज सुटणारी त्वचा,झोपेचा त्रास,मळमळ आणि उलट्या,उच्च रक्तदाब अशी लक्षण दिसून येतात. मूत्रपिंडाच्या आजाराची जी अनेक कारण आहेत.

यामध्ये उच्चरक्तदाब आणि मधुमेह हे दोन आजार आहेत यामुळे मूत्रपिंडावर ताण पडून त्याचे कार्य मंदावते. ग्लोमेरुलोनेफ्रायटीस या प्रकारच्या मूत्रपिंडाच्या आजारात ग्लोमेरुलिचे नुकसान होते. पॉलिसिस्टिक किडनी आजारात मूत्रपिंडात अनेक द्रवपदार्थानी भरलेले सिस्ट वाढतात ,ज्यामुळे मूत्रपिंडाची कार्यक्षमता कमी होते. मेम्ब्रेन्स नेफ्रोपॅथी या विकारात शरीराची प्रतीकरशक्ती कमी होऊन मूत्रपिंडावर हल्ला होतो.

**मूत्रपिंडाच्या आजारावर उपचार पद्धती कोणत्या आहेत?**

■ मूत्रपिंडाच्या आजारात अगोदर डॉकटर शारीरिक तपासण्या करतात आणि निदान झाले कि मगच पुढील उपचार सूर करतात. निदान करण्यासाठी ज्या चाचण्या आहेत त्यामध्ये तुमचा ग्लोमेरुलार फिल्टरेशन रेट हे तुमचे मूत्रपिंड किती क्षमतेने रक्त फिल्टर करते हे ठरवले जाते. रक्तातील क्रिएटिनची पातळी देखील तपासली जाते . लघवीमध्ये प्रथिनांचे प्रमाण किती हे देखील तपासले जाते. शिवाय मूत्रपिंडाचा आकार अंडी टाटासं चाचण्या केल्या जातात.

दीर्घकालीन मूत्रपिंडाच्या आजारावर डायलेसिस केले जाते आणि ठराविक कालावधी नंतर मूत्रपिंडातील रक्ताचे शुद्धीकरण केले जाते. मात्र, काही प्रकारच्या आजारासाठी काही विशिष्ट औषधोपचार केला जातो. तसेच अगदीच आवश्यकता असेल तर काही शस्त्रक्रिया देखील उपलब्ध आहेत. ■ ■ ■

## जांभळा दिवसचे आयोजन

एपिलेप्सी फाउंडेशन इंडियाने अलीकडेच एपिलेप्सी फाउंडेशन, मुंबई येथे PWE साठी जनजागृती कार्यक्रमर आयोजित केला. जांभळा हा एपिलेप्सीचा रंग आहे आणि या आजाराबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी ढहए जांभळा रंग घालतात. सुमारे २७५ ढहए जागरूकता कार्यक्रमात सहभागी झाले होते, त्यापैकी १८५ लोटस हाऊस येथे उपस्थित होते आणि उर्वरित ९० PWE ऑनलाइन होते.



कार्यक्रमाची सुरुवात "Pwerple day" वरील चित्रकला स्पर्धा आणि निबंध स्पर्धेने झाली ज्यामध्ये २० हून अधिक जणांनी भाग घेतला आणि टॉप ३ विजेत्यांची निवड झाली आणि बक्षिसे देण्यात आली. एपिलेप्सी फाउंडेशनचे संस्थापक विश्वस्त आणि अध्यक्ष डॉ. निर्मल सूर्या यांनी पर्पल डे निमित्त सर्वांचे स्वागत केले. त्यांनी पर्पल डेच्या संस्थापक सुश्री कॅसिडी मेगन यांची ओळख करून दिली आणि अशा प्रसंगी एपिलेप्सीबद्दल जागरूकता निर्माण करण्याची गरज सांगितली. ■ ■ ■

## बहुगुणी शेवगा



शेवग्याच्या शेंगांबरोबरच पानं, फुलंदेखील खाण्यासाठी वापरली जातात. या झाडाचे हे तीनही भाग खूप फायदेशीर आहेत. शेवग्यामध्ये प्रथिनं, अमीनो ॲसिडस्, बीटा-कॅरोटीन आणि फिनॉलिक असतात जे उच्च रक्तदाबाच्या रुग्णांसाठी फायदेशीर ठरतात. शेवग्याच्या शेंगेमध्ये मुबलक प्रमाणात कॅल्शियम असते. मुलांसाठी याचा खूपच फायदा होतो. यामुळं हाडं आणि दात मजबूत होतात. शेंगा खाल्ल्यानं गर्भवती महिलांना भरपूर कॅल्शियम मिळतं. लठ्ठपणा आणि अतिरिक्त साठलेली चरबी कमी करण्यास याची मदत होते. ■ ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

# राज्य सरकारचा बुलडोझर पंक्चर झाला का?

## अबू आझमी यांचा संतप्त सवाल

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३१ :

मुस्लिम समाजाच्या व्यक्तीने एखादा गुन्हा करण्याचा विचार जरी केला तरी त्यावर कड कारवाई केली जाते. मात्र, बीडमध्ये मशिदीत बॉम्बस्फोट करण्यात आला आहे. अशावेळी राज्य सरकारचा बुलडोझर पंक्चर झाला का? असा संतप्त सवाल समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी यांनी विचारला आहे.

या प्रकरणात कठोरातील कठोर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली आहे. तसेच या प्रकरणाचा एनआयए आणि एटीएस यांच्याकडून चौकशी करण्याची मागणी देखील त्यांनी केली आहे. बीडमध्ये झालेल्या मशिदी बॉम्बस्फोटानंतर आता या प्रकरणाचे राजकीय पडसाद उमटत आहेत.

बीडमधील मशिदीत झालेल्या स्फोटावर समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी म्हणाले की, जेव्हा मंत्री आणि मुख्यमंत्रीही दररोज मुस्लिमांविरुद्ध बोलतील, तेव्हा सामान्य माणसात मुस्लिमांविरुद्ध द्वेष निर्माण होईल आणि हे त्याचेच परिणाम आहे. मी अशी मागणी करतो की, दहशतवादी प्रकरणांमध्ये लावण्यात येणारे सर्वात कठोर कलम त्याच्यावर लावण्यात यावेत. एनआयए आणि एटीएसने चौकशी करावी, असे आझमी म्हणाले.

# ७२ आसनी प्रवासी विमानाचे बेलोरा येथे यशस्वी लँडिंग

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. ३१ :



अमरावतीच्या बेलोरा विमानतळावर दुपारी अलायन्स एअरलाइन्सच्या एटीआर-७२ विमानाने लँडिंग व टेकऑफ चाचणी यशस्वीरीत्या पूर्ण केली आहे. इंदूरहून आलेले ७२ आसनी विमान पहिल्यांदाच बेलोरा विमानतळावर उतरले आहे.

दरम्यान २१ मिनिटे थांबल्यानंतर हे विमान पुन्हा इंदूरला जाण्यासाठी येथून उडाले. मात्र, ३१ मार्चला विमानतळावरून विमानसेवा सुरू होणार, अशी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अर्थसंकल्पात केलेली घोषणा अमरावतीकरांचा भ्रमनिरास करणारी ठरली. आता कधी विमानसेवा सुरू होईल, याबाबतचा कोणताही मुहूर्त संबंधित यंत्रणेकडून जाहीर करण्यात आला नाही.

प्रादेशिक संपर्क योजना (आरसीएस) उडान अंतर्गत व्यावसायिक विमान सेवेसाठी या विमानतळाची पूर्ण तयारी असल्याचे दाखवणारे हे विशेष चाचणी विमान इंदूरहून अमरावतीला आले.

अत्याधुनिक पायाभूत सुविधा, नेव्हिगेशन प्रणाली आणि ग्राउंड हँडलिंग क्षमतांचा हा पहिला यशस्वी क्षण होता. त्यानंतर ४ वाजून १७ मिनिटांनी विमानाने पुन्हा इंदूरसाठी उड्डाण घेतले. अमरावती विमानतळ विदर्भाच्या अर्थव्यवस्था, व्यापार, पर्यटन आणि हवाई संपर्कासाठी गेम-चेंजर ठरणार आहे. महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी (एमएडीसी) तर्फे विकसित हे विमानतळ केवळ पायाभूत सुविधा नव्हे, तर उद्योग, व्यवसाय, प्रवाशांसाठी महत्वाचे ठरणार आहे.

टियर-२ आणि टियर-३ शहरांना विमानसेवा उपलब्ध करून देण्याच्या दिशेने हा महत्त्वाचा टप्पा आहे, असे एमएडीसीकडून सांगण्यात आले आहे. अमरावती विमानतळावरून ३१ मार्चला प्रवासी विमानसेवा सुरू होईल, असे अर्थमंत्री अजित पवार यांनी १० मार्चला विधानसभेत अर्थसंकल्प सादर करताना सांगितले होते.

त्यानंतर १३ मार्चला डीजीसीएकडून या विमानतळाला परवाना मिळाल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केले होते. त्यांनीही मार्चच्या शेवटच्या आठवड्यात विमानसेवा सुरू होईल, अशी शक्यता वर्तवली होती. मात्र, ३१ मार्चला विमानसेवा सुरू होणार नाही, हे स्पष्ट झाले. त्यामुळे अमरावतीकरांना आता पुन्हा नवी तारीख ऐकावी लागणार आहे. दरम्यान तारीख अद्याप निश्चित नसली तरी एकंदरीत विमानतळावरील कामाची प्रगती लक्षात घेता लवकरच बेलोरावरून विमानसेवा सुरू होण्याच्या दृष्टीने हालचाली सुरू झाल्या आहेत.

दोन्ही वैमानिक सादर करणार डीजीसीए, अलायन्सला अहवाल इंदूरहून बेलोरा विमानतळावर आलेले अलायन्स एअरलाइन्सच्या एटीआर-७२ या विमानाचे लँडिंग व टेकऑफ कसे राहिले, विमानतळावरील सर्व उपकरणे, यंत्रणा व्यवस्थित काम करत होत्या की नाही, याबाबत दोन्ही वैमानिक डीजीसीए तसेच अलायन्स एअरलाइन्सला अहवाल सादर करणार आहेत.